POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-३४२ ● मुंबई, रविवार, १३ जूलै २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA



## त्यांना टायरात घालून मारा, तो अजित पवारचा नातेवाईक का असेना

# उपमुख्यमंत्री दादांचा बारामतीकरांना दम

**■पुणे । प्रतिनिधी :**
सुरुवातीलाच सावित्री हॉस्पिटलचे उद्घाटन झाले जाहीर करतो, हॉस्पिटलच्या माध्यमातून चांगली वैद्यकीय सेवा उपलब्ध करून दिली आहे. बारामती शहराची ओळख मेडिकल हब म्हणून होत आहे. पुण्यश्लोक होळकरांच्या नावाने आपण बारामती मेडिकल कॉलेज सुरू केलं. आता, आयुर्वेदिक महाविद्यालयाचे काम सुरू आहे. कॅन्सर हॉस्पिटल देखील आपण बारामतीत करत आहोत. महाराष्ट्रामध्ये बारामतीचे बस स्थानक उत्तम झालं आहे, तसेच वर्कशॉप देखील करत आहोत. बारामती हॉस्पिटलमध्ये कॅन्सर विभाग सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. लवकरच त्याला निधी देण्याचं काम होईल, आरोग्य खातं आपल्याकडेच आहे. मला ३५ वर्षे बारामतीकरांनी सेवा करण्याची संधी दिली, चांगली आरोग्य सेवा देण्याचा माझा प्रयत्न आहे, असे म्हणत उपमुख्यमंत्री अजित पवारांनी बारामतीकरांशी संवाद साधला. यावेळी, बेशिस्त वागणाऱ्यांना टायरात घालून मारा, असे निर्देशच पोलिसांना दिले. बारामतीकरता, इंदापूरकरता, महाराष्ट्राकरिता ज्या ज्या गोष्टी करता येतील त्या गोष्टी महायुती सरकार करत आहे, असे म्हणत अजित पवारांनी बारामतीमधील हॉस्पिटल उद्घाटनाच्या कार्यक्रमातून आरोग्य सुविधांची आणि बारामतीमधील विकास कामांची माहिती दिली. यावेळी, बेशिस्तपणा खपवून घेतला जाणार नाही, म्हणत बारामतीकरांना चांगलाच इशाराही दिला. काही काही जण चुका करत आहेत, रस्त्यावर कचरा टाकत आहेत. जनावरे चरायला सोडत आहेत मी त्यांना कृपा करून सांगतो आता ती जनावर कोंडवड्यात घातली तर ठीक, नाही ऐकलं तर त्यांना बाजार दाखवतो. आता जे मालक लोक आहेत त्यांना निवार्णीचा इशारा देतो, ऐकलं तर ठीक नाही ऐकलं तर मालकांवर केसेस होतील, असे अजित पवार यांनी म्हटले. तसेच, ज्यांची गाढव आहेत, जनावर आहेत, ज्यांच्या गाई इकडे-तिकडे फिरत असतात. तुम्ही तुमच्या दारात बांधायचे ते बांधा, काय खायला प्यायला घालायचं ते घाला, बारामती जी चांगली करतो ती काय सगळ्यांना मोकळी फिरण्याकरता नाही, असेही अजित पवारांनी म्हटले.

कधी कधी मोटरसायकलवाले इकडे तिकडे बघतात, हळूच ओव्हरटेक राँग साईडने जाण्याचा प्रयत्न करत आहेत. असा माणूस सापडला तर तो मुलगा किंवा व्यक्ती कितीही मोठ्या बापाची असली तरी त्याला टायरमध्ये घेऊन असा झोडायला सांगणार आहे की त्याला दहा पिढ्या आठवल्या पाहिजे. अजिबात नियम कोणीही तोडू नका, मग तो अजित पवार असो किंवा अजित पवाराचा कोणी नातेवाईक असेल. सर्वांना नियम सारखा आहे. मी जे करतो ते बारामतीकरांसाठी, सर्वांसाठी करतो, असे म्हणत बेशिस्त वाहन चालवणाऱ्यांना अजित पवारांनी फटकारले. मी अनेक ठिकाणी झाड लावली आहेत, तिथे कोणी पण येत आहे, जनावरं खात आहेत. पण, तसं चालणार नाही. जिथे माणसांना बसायला केलं आहे तिथे एकजण मोटरसायकल घालून निवांत मांडी घालून लोकांसोबत गप्पा मारतोय. गाडी वळवली आणि पोलिसांना सांगितले की, याची गाडी ताब्यात घे आणि याला चांगला टायरमध्ये घाल, मग तो म्हणतोय दादा चुकलं.



# मुंबई भोंगेमुक्त

## धार्मिक स्थळांवरील १,६०८ भोंगे हटवले

**सणासुदीच्या काळात तात्पुरती परवानगी!**
धार्मिक स्थळावरील भोंगे हटवले ही चांगली गोष्ट आहे. परंतु सणासुदीच्या काळात लाऊडस्पीकर लावले जातात. त्यावर कारवाई करण्यात येऊ नये, अशी मागणी शिवसेना आमदार आदित्य ठाकरे यांनी केली. त्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, सणासुदीच्या काळात संबंधितांना तात्पुरती परवानगी देण्यात येईल. मुख्यमंत्री म्हणाले की, ह्वकायद्याने तत्काळ परवानग्या घेऊन मंडळांना भोंगे लावण्याची परवानगी देता येते. त्यासाठी डेसिबलची मर्यादा असते. यावेळी निश्चितपणे कोणालाही त्रास होणार नाही,ह्व अशी ग्वाही त्यांनी दिली.

**सकाळचा भोंगा बंद करण्याचा विचार!**
या चर्चेच्या वेळी मंत्री अनिल पाटील म्हणाले की, मुख्यमंत्रीजी तुमच्याकडून इतके चांगले काम होते. पण, त्या सकाळच्या १० च्या भोंग्याची तक्रार आहे. याचाही तुम्ही विचार करा, असे त्यांनी म्हटले. त्यांच्या या वक्तव्यावर सभागृहात एकच हशा पिकला, मुख्यमंत्र्यांनी देखील त्यास हसत-खेळत उत्तर दिले. ते म्हणाले की, "त्यात अडचण हीच आहे की, आता ध्वनी प्रदूषणाच्या विरोधात आपल्याकडे कायदा आहे. पण, विचाराच्या प्रदूषणाविरोधातला कायदा आपल्याकडे व्हायचा आहे. तो कायदा झाला की त्याचा आपण विचार करू."

**■मुंबई । प्रतिनिधी :**
राज्यातील धार्मिक स्थळांवरील भोंगे हटवण्याचे काम प्रगतिपथावर असून ३,३६७ धार्मिक स्थळावरील भोंगे हटवले आहेत. त्यात मुंबईतील १,६०८ भोंग्यांचा समावेश आहे. मुंबई भोंगेमुक्त झाली आहे. आता ज्या पोलीस स्टेशनच्या हद्दीत भोंगे दिसतील तेथील पोलीस स्टेशनचा अधिकारी त्यास जबाबदार असेल, असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला. विधानसभा सदस्य सुधीर मुनगंटीवार यांनी शुक्रवारी विधानसभेत लक्षवेधी सूचनेद्वारे या मुद्याकडे लक्ष वेधले. विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात शुक्रवारी विधानसभा सदस्य सुधीर मुनगंटीवार यांनी धार्मिक स्थळांवरील भोंग्याचा मुद्दा लक्षवेधी सूचनेद्वारे उपस्थित केला. महाराष्ट्रात विविध धर्मीयांची धार्मिक स्थळे आहेत. धार्मिक स्थळांवरील लाऊडस्पीकर, भोंगे यांच्या आवाजामुळे ध्वनिप्रदूषण होऊन तेथील रहिवाशांना त्रास सहन करावा लागतो. लाऊडस्पीकर, भोंग्यामुळे लोकांना त्रास होऊ नये यासाठी सर्वोच्च न्यायालयाने मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. त्यानुसार धार्मिक स्थळावरील भोंगे हटवणे यावर काय कारवाई करण्यात आली, अशी विचारणा मुनगंटीवार यांनी केली.

आतापर्यंत ३,३६७ धार्मिक स्थळांवरील भोंगे हटवले आहेत. यात मुंबईतील १,६०८ भोंगे हटवले आहेत. त्यात १,१४९ मशिदी, ४८ मंदिरे, १० चर्च, ४ गुरुद्वारा आणि १४७ इतर धार्मिक स्थळांवरील भोंग्यांचा समावेश आहे. सध्या मुंबईतील एकाही धार्मिक स्थळावर भोंगा नाही. राज्यात १,७५९ धार्मिक स्थळांवरील भोंगे हटवले आहेत. यासंदर्भात एक अहवाल उच्च न्यायालयाकडे दाखल केला आहे. यावर न्यायालयाने समाधान व्यक्त केल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

कोणताही धार्मिक तणाव न होऊ देता मुंबई पोलिसांनी धार्मिक स्थळावरील भोंगे हटवले. त्यामुळे पोलिसांचे मुख्यमंत्र्यांनी अभिनंदन केले.

## डेसिबल मर्यादेत सुधारणा करणे गरजेचे... सना मलिक-शेख यांची शिफारस



**केंद्राकडे शिफारस करणार**
सना मलिक - शेख यांनी मांडलेल्या शिफारसीवर उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा विषय खरा असल्याचे सांगितले आणि या मुद्द्यावर सखोल विचार करून सुधारित मर्यादांसंदर्भात शिफारस केंद्र सरकारकडे पाठवण्याचे आश्वासन दिले.

**■मुंबई । प्रतिनिधी :**
पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ अंतर्गत ठरवलेली ध्वनिप्रदूषण मर्यादा सध्याच्या परिस्थितीत अपुरी ठरत आहे. त्यामुळे डेसिबल मर्यादेत सुधारणा करणे गरजेचे असल्याची शिफारस विधानसभा सदस्या सना मलिक-शेख यांनी धार्मिक कार्यक्रमातून होणाऱ्या ध्वनिप्रदूषण विषयावर लक्षवेधी सुरू असताना करत सभागृहाचे लक्ष वेधले. याबाबत केंद्र सरकारला शिफारस करण्यात येईल, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिले.

सन २००० मध्ये ध्वनिप्रदूषण कायदा बनवला आहे. त्यामध्ये रहिवासी भागात दिवसा ५५ आणि रात्री ४५ इतकी डेसिबल मर्यादा आहे, तर व्यावसायिक भागात दिवसा ६५ आणि रात्री ५५ डेसिबल व इंडस्ट्रियल भागात दिवसा ७५ आणि रात्री ७० डेसिबल मर्यादा आहे. मात्र आजच्या घडीला ही डेसिबल मर्यादा कोणी पाळत नाही. त्यामुळे या मर्यादांमध्ये सुधारणा करण्याची गरज आहे.

हा विषय केंद्र सरकारच्या अखत्यारित येतो. त्यामध्ये राज्य सरकार बदल करू शकत नाही, परंतु राज्यात याबाबत सर्वे करून तसा प्रस्ताव केंद्र सरकारकडे एकमताने पाठवला तर आपल्याला नवीन डेसिबल मर्यादांमध्ये सुधारणा मिळू शकते. सभागृहातील डेसिबल मर्यादा ६० च्या वर आहे हेही सना मलिक-शेख यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.

## पुण्यात यशवंत नाट्यगृहात वंचितच्या कार्यकर्त्यांचा राडा

# नाटकाच्या प्रयोगादरम्यान घोषणाबाजी



**नाटकाच्या शेवटी बुद्धांवरती तलवार उगारली**
आणखी एका कार्यकर्त्याने सांगितले की, "या नाटकात गौतम बुद्धांच्या विचारांचे पूर्णपणे हनन करण्यात आले आहे. या देशात बुद्धांच तत्वज्ञान कामाचं नाही, इथे फक्त भांडणे करुन प्रश्न सुटू शकतो असं यात दाखवण्यात आले आहे. या नाटकाच्या शेवटी बुद्धांवरती तलवार उगारण्यात आली आहे." दरम्यास सध्या घटनास्थाळावर पोलिस पोहोचले असून परिस्थिती नियंत्रित केली जात आहे.

**■पुणे । प्रतिनिधी :**
पुण्यातील यशवंत नाट्यगृहात वंचितच्या कार्यकर्त्यांनी राडा घातल्याचे समोर आले आहे. संगीत सन्न्यस्त खड्ग या नाटकाच्या प्रयागादरम्यान कार्यकर्यांनी घोषणाबाजी केली. हे नाटक स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुस्तकावर आधारीत आहे. या नाटकातून भगवान गौतम बुद्ध यांचा अपमान केल्याचा आरोप वंचिने केला आहे. त्यामुळे वंचितच्या कार्यकर्त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ ठिय्या केला.

या बाबत बोलताना वंचितच्या कार्यकर्त्यांनी म्हटले की, 'सावरकर लिखित हे नाटक आहे. या नाटकाचा दुसरा प्रयोग होत आहे. सावसकरांच लिखाण नेहमी फुले शाहू आंबेडकरांच्या आणि गौतम बुद्धांच्या विरोधात राहिलेलं आहे. आम्ही ने नाटक पहायला आलो होतो, नाटक पूर्ण पाहिले. यात सावरकरांना जगासाठी बुद्ध कामाचा नसून युद्ध कामाचे आहे असा संदेश दिला आहे. या नाटकात हिंसेचे समर्थन करण्यात आले आहे.'

याबाबत बोलताना एका महिला कार्यकर्त्याने सांगितले की, नाटकामधून सावरकरांनी सांगितले की शांततेने नव्हे तर भांडणातून मार्ग निघू शकतो. गौतम बुद्धांची शिकवण आहे की, शांततेत सर्व प्रश्न सुटू शकतात, याला विरोध करण्यात आला आहे.

## खांद्यावर नांगर, डोळ्यांत अश्रू, पायात चपलाही नाहीत

## कर्जमाफीसाठी लातूरच्या शेतकऱ्यांची ५०० किमी पदयात्रा

**■लातूर । प्रतिनिधी :**
मरण येतं, पण कर्ज जात नाही, ही शोकांतिका अनुभवणारे शेतकरी आजही न्यायासाठी रस्त्यावर आहेत. लातूर जिल्ह्यातील सहदेव होणाळे आणि गणेश सूर्यवंशी या शेतकऱ्यांनी पाठीवर नांगर घेत ५०० किमीची पायी पदयात्रा करत थेट मंत्रालय गाठण्याचा निर्धार केला आहे. आज त्यांच्या या संघर्षाचा नववा दिवस आहे.

डोळ्यांत अश्रू आहेत, पायात चपला नाहीत, फोड फुटले आहेत पण मनात आहे फक्त एकच ध्यास कर्जमुक्तीचा आणि न्यायाचा. आपली व्यथा मांडताना सहदेव होणाळे यांना अक्षरशः अश्रूंना बांध घालता आला नाही. ते म्हणाले व्हिडिओ व्हायरल झाला म्हणून कर्जमाफी मिळते, मग आमचं रोजचं जगणं सरकारला दिसत नाही का? या दोघांनी ४५० किमीहून अधिक अंतर पार केलं असून आज ते भिवंडीत दाखल झाले आहेत. चालताना त्यांच्या पायांवर फोड फुटले आहेत. पण नांगर जणू एक बाण बनवून, त्यांनी व्यवस्थेच्या हृदयावरच घाव घालायचं ठरवलं आहे.



**राजकारण्यांनी राज्यात मराठा व ओबीसी समाजात भांडण लावण्याचं काम केलं**
राज्यात मराठा व ओबीसी समाजात राजकारण्यांनी भांडण लाऊन स्वतःचा स्वार्थ साधण्याचा प्रयत्न केला गेला. दुर्दैव म्हणजे त्यामुळे शेतकऱ्यांच्या मूळ प्रश्नाकडे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळं शेतकऱ्यांच्या मूळ प्रश्नाला हात घालण्यासाठी ओबीसी समाजाचा सहदेव निघाला. त्याला साथ देण्यासाठी गणेश मराठा त्याच्या सोबत निघाले आहेत. देशातील शेतकऱ्याचा हा नांगर केवळ शेत नांगरत नाही तर तो सरकारच्या काळजाविना व्यवस्थेवर ही आता घाव घालत रस्त्यावर उतरला आहे.

**शेतकऱ्यांच्या व्यथा मायबाप सरकारला कधी दिसणार?**
निवडणुकीच्या तोंडावर सरकार अनेक घोषणा करते. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या गाजावाजा करतात, पण प्रत्यक्षात या घोषणा कधी वास्तवात उतरणार का? हा सवाल सहदेव यांच्यासारख्या शेतकऱ्यांच्या मनात धगधगतोय. भाषणात आम्हाला हिरो बनवलं जातं. पण रस्त्यावर चालताना आम्ही कोण? सहदेव म्हणाले माझ्यावर दीड लाख कर्ज आहे ते मी कसेही फिडेल पण बाकी शेतकऱ्यांचं काय? अनेक शेतकरी कर्जमाफीच्या प्रतीक्षेत आहेत. त्यांना न्याय कोण देणार एका वृद्ध शेतकऱ्याची व्यथा व्हायरल व्हिडिओमुळे दिसून येते. मग इतर शेतकऱ्यांच्या व्यथा मायबाप सरकारला कधी दिसणार? असा सवाल सहदेव होणाळे यांनी उपस्थित केला आहे.

## पुढील ७ दिवस धोक्याचे

**■मुंबई । प्रतिनिधी :**
गेल्या एक महिन्यांपासून देशातील अनेक भागांमध्ये जोरदार पाऊस सुरू आहे. काही राज्यांमध्ये तर एवढा पाऊस झाला आहे, त्यामुळे प्रचंड प्रमाणात नुकसान झालं आहे, पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. सतत पाऊस सुरू असल्यामुळे तापमान कमी झालं असून, लोकांना उकाड्यापासून दिलासा मिळाला आहे. याचदरम्यान आता पुन्हा एकदा भारतीय हवामान विभागाकडून पावसाचा इशारा देण्यात आला आहे. आएमडीनं दिलेल्या इशाऱ्यानुसार पुढील सहा दिवस अनेक राज्यांमध्ये अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे.



# बसमध्ये पंढरपूरवरुन निघाले वारेकरी

## बसमधील चालक-वाहक दारुच्या नशेत, ३७ प्रवाशांचा जीव धोक्यात

**■पंढरपूर । प्रतिनिधी :**
पंढरपूर 'गाव तेथे एसटी' हे ब्रिदवाक्य घेऊन राज्यातील कानाकोपाऱ्यात धावणारी लालपरी सर्वसामान्य प्रवाशांसाठी विश्वासार्ह प्रवास करण्याचे माध्यम आहे. परंतु पंढरपूरवरुन निघालेल्या बसमधील धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पंढरपूरमध्ये आषाढी वारीसाठी लाखोंच्या संख्येने वारेकरी आले होते. त्यांना पुन्हा गावी नेण्यासाठी एसटी महामंडळाने जादा बसेस देखील सोडल्या. पण एका बसमधील चालक-वाहक दारुच्या नशेत होते. त्या बसमध्ये महिला वारेकरी आणि लहान मुले जास्त होते. हा प्रकार उघड झाल्यानंतर एसटी प्रशासन हादरले आहे. एसटी प्रशासनाने त्या दोघांच्या निलंबनाची प्रक्रिया सुरू केली आहे.

**बीडमध्ये दोघांना घेतले ताब्यात**

पंढरपूरवरून अकोट आगाराची बस (एमएच -१४-६१४०) अकोल्यातील अकोटकडे येत होती. या बसमध्ये चालक संतोष रहाटे व वाहक संतोष झाल्टे होते. एसटी बसमधील चालक व वाहक दोन्ही दारूच्या नशेत होते. या प्रकारामुळे ३७ प्रवाशांचा जीव धोक्यात आला. ही गंभीर घटना गुरुवारी रात्री बीड जिल्ह्यात उघड आली. संतप्त प्रवाशांच्या तक्रारीनंतर बीड पोलीस व एसटी प्रशासनाने दोघांना ताब्यात घेतले. आता त्यांच्या निलंबनाची प्रक्रिया सुरू आहे.

**वाहक गाडीत पडला...**

पंढरपूरवरुन अकोट बस गुरुवारी दुपारी ४ वाजता निघाली होती. बसमध्ये महिला-पुरुष असे एकूण ३७ प्रवासी होते. त्यात दोन लहान मुलांचाही समावेश होता. बस निघतानाच चालक व वाहक दारूच्या नशेत असल्याचा संशय प्रवाशांना आला होता. मात्र, बीड ते अंबड मार्गावर रात्री ८ ते ९ च्या सुमारास दोघांवर पूर्णपणे नशा चढल्याचे स्पष्ट झाले. वाहक गाडीतच लोळत पडला होता, तर चालक बस सुरक्षितरीत्या चालवू शकत नव्हता. यामुळे बसमधील महिला व वृद्ध प्रवासी घाबरले. काही प्रवाशांनी आपल्या नातेवाइकांना फोन करून परिस्थितीची माहिती दिली.



**व्हिडिओ आला समोर**
बसमधील एका महिला वारेकरीचा व्हिडिओ समोर आला आहे. व्हिडिओमध्ये त्या म्हणतात, आम्ही महिन्याभरापासून पायी दिंडीत होते. आता घरी निघाला असताना ही बस मिळाली. या बसमधील चालक-वाहक दारुच्या प्रचंड नशेत आहे. आता परिस्थिती अशी आहे की आम्ही बसमधून बाहेर जाऊ शकत नाही. कारण बसमध्ये आम्ही महिला आणि लहान मुलेच जास्त आहे. बाहेर आंधार आहे. पाऊससुद्धा सुरु आहे.

## लिंबू, बाहुली, कागद शेजाऱ्यांच्या घरासमोर ठेवले अन्...

**■नागपूर । प्रतिनिधी :**
भीती दाखविण्यासाठी शेजाऱ्याच्या घरासमोर काळ्या रंगाची बाहुली, हिरवी मिरची व लिंबू ठेवण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार नवीन कामठी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील लिहिगाव येथे घडला. याप्रकरणी पोलिसांनी दोघांविरूद्ध जादुटोणा प्रतिबंधक कायद्यासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला. गजानन चैतराम उईके (वय ४१, लिहिगाव) व त्यांचा साथीदार प्रवीण हेमचंद मेश्राम(रा. गुमथाळा) ,अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. अभिषेक संजय ठाकरे (२५) यांच्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलिसांकडून प्राप्त माहितीनुसार, संजय व उईके यांची शेती आहे. संजय यांचा दुधाचाही व्यवसाय आहे. संजय व उईके हे शेजारी राहतात. गेल्या अनेक दिवसांपासून त्यांच्या विहिरीवरून वाद सुरू आहे. जानेवारी महिन्यांत हे प्रकरणा पोलिस ठाण्यात गेले. सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. १० जुलैला मध्यरात्री संजय यांच्या घरासमोर काळी बाहुली, लिंबू ,मिरची व कागद ठेवण्यात आला. कागदावर संजय व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांची नावे लिहिली आहेत. सकाळी संजय यांना हे साहित्य घरासमोर दिसले.संजय यांनी पोलिस नियंत्रण कक्षाला माहिती दिली.

नियंत्रण कक्षाने नवीन कामठी पोलिसांना कळविले. माहिती मिळताच पोलिस तेथे पोहोचले. पोलिसांनी संजय यांच्या घरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. यावेळी उईके व प्रवीण हे दोघे हे साहित्य ठेवत असल्याचे दिसले. पोलिसांनी सीसीटीव्हीचा डिव्हिआर जप्त केला. संजय यांनी पोलिसांत तक्रार दिली. पोलिसांनी दोघांविरूद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

अलीकडेच यवतमाळ येथील एक अघोरी प्रकार समोर आला होता. महादेव परशुराम पालवे उर्फ माउली या मांत्रिकाकडे दिग्रस येथील नीतू जयस्वाल या उपचारासाठी येत होत्या. त्यांच्यासोबत त्यांची १४ वर्षांची मुलगीही येत होती. उपचाराच्या नावाखाली मांत्रिकाने पूर्जाअर्चा करून त्या दोघांना संमोहित केले. यानंतर त्या मायलेकी मांत्रिकाच्या घरीच राहू लागल्या. नंतर मुलीलाही बाधा झाल्याचे सांगून त्याने तिच्यावरही अघोरी उपचार सुरू केले. तो तिला उपचाराच्या नावाखाली चटके देत होता. बाहेरची शक्ती तिच्या शरीरात असल्याचे सांगत बेदम मारहाणही करायचा. जेवण बंद असल्याने दोघीही अशक्त झाल्या. मांत्रिकाकडे काहीतरी भयंकर कृत्य होत असल्याचा शेजाऱ्यांना संशय आला. त्यांनी याची माहिती पोलिसांना दिली. ठाणेदार रामकृष्ण जाधव यांनी पथकासह मांत्रिकाच्या घरावर धाड टाकत नीतू यांच्यासह त्यांच्या मुलीची सुटका केली.



## १०८ रुग्णवाहिकेनं पुन्हा दिला दगा, गर्भवती महिलेचा ऑटोतून प्रवास... भररस्त्यातच दिला बाळाला जन्म

मुखेड तालुक्यातील मेथी गावात एका ९ महिन्याच्या गर्भवतीला घेऊन नातेवाईकानी चक्क ऑटोतून प्रवास सूरू केला, त्यावेळी प्रसुतीकळा वाढल्याने महिलेची भररस्त्यातच प्रसुती झाल्याची घटना समोर आली आहे. नांदेड जिल्ह्याच्या मुखेड तालूक्यातील मेथी गावातील ही घटना असून २२ वर्षीय अश्विनी नालापले यांच्यासमवेत ही घटना घडली. सुदैवाने बाळ आणि बाळंतीण सुखरुप आहे. अश्विनी यांना आज सकाळी प्रसुतीवेदना सूरू झाल्या, त्यावेळी नातेवाईकानी रुग्णवाहिकेच्या 108 क्रमांकवर फोन केला. मात्र, नेहमीच्याच ओरडप्रमाणे रुग्णवाहिका उपलब्ध झालीच नाही. त्यामुळे, महिलेच्या वेदना वाढत असल्याने नातेवाईकांनी ९ महिन्याच्या गर्भवती महिलेला घेऊन ऑटोतून प्रवास केला. मात्र, रस्त्यातच प्रसूती कळा वाढल्याने नात्यातील महिलांनी होनवडज फाट्याजवळ ऑटो थांबवला. रस्त्यालगच्या शेतात साडीचा आडोसा देऊन गर्भवती महिलेची प्रसुती करण्यात आली. यावेळी, महिलेने गोंडस मुलाला जन्म दिला. दरम्यान, याठिकाणी आई आणि बाळाची नाळ तोडण्याची व्यवस्था नव्हती. त्यामुळे, स्थानिकांनी रुग्णवाहिका मागवून तातडीने आई आणि बाळाला मुखेड येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. बाळ आणि बाळंतीण दोघेही सुखरूप आहेत.




**■नांदेड । प्रतिनिधी :**
सरकारकडून रुग्णसेवा अतिशय चांगल्या दिल्या जातात, विविध योजनांच्या माध्यमातून गरिब रुग्णांवर मोफत उपचार केले जातात, असा डंका पिटला जातो. विशेष म्हणजे, गर्भवती महिलांसाठी किंवा नुकतेच्या माता झालेल्या महिलांची देखील काळजी घेण्यात येत असल्याचे सांगितले जाते. मात्र, वस्तूस्थिती वेगळीच दिसून येते. आजही कित्येक भागात गर्भवती महिलांना चक्क झोळी करुन रुग्णालयात नेण्यात येते, किंवा गरोदर महिलांना सुविधां अभावी मोठा त्रास सहन करावा लागतो. त्यातच, सरकारकडून १०८ रुग्णवाहिका काही मिनिटांत हजर होईल, असे सांगितले जाते. मात्र, या रुग्णवाहिकेकडून सातत्याने दगाच बसतो. नांदेडमध्ये पुन्हा एकदा त्याची अनुभूती आली. येथील एका २२ वर्षीय महिलेला प्रसुती वेदना सूरू झाल्यानंतर नातेवाईकानी १०८ क्रमांकावर फोन केला. मात्र, रुग्णवाहिकाच उपलब्ध झाली नाही.



## संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# साहेब एकदा रेशनचे धान्य खाऊन बघा

मुंबईच्या आमदार निवासातील कँटीनमध्ये दिलेल्या अन्नाची दुर्गंधी आल्याचा दावा करीत शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी तेथील कर्मचार्‍याला बेदम मारहाण केली. बनियान आणि टॉवेलवर असलेल्या गायकवाड यांनी एखाद्या बॉक्सरप्रमाणे एकामागोमाग एक पंच मारले. त्यांची ही गुंडगिरी नक्की कसले द्योतक आहे? संजय गायकवाड हे आमदार असले तरी मारहाण करण्याचे अधिकार त्यांना दिले कुणी? ते लोकप्रतिनिधी असून त्यांच्याकडून जबाबदार आणि सभ्य वागणूक अपेक्षित आहे, पण त्यांनी दाखवलेली ही मस्ती, घमेंड आणि हिंसा हे कुठल्याही लोकशाहीत शोभत नाही. अन्न खराब असेल तर त्यावर तक्रार करता येते, चौकशी करण्याची मागणी करता येते, पण मारहाण करून कुणालाही आपली भीती दाखवणे ही केवळ गुंडगिरीच आहे. या घटनेनंतर संजय गायकवाड नमले नाहीत, तर गर्वाने म्हणताहेत की, मला काहीही पश्चाताप नाही. हे किती धोकादायक आहे. एक आमदार जर सार्वजनिक ठिकाणी असा राडा करू शकतो, तर सामान्य नागरिकांनी काय अपेक्षा ठेवायच्या? या घटनेमुळे संजय गायकवाड यांची मस्तीखोर वृत्ती, सामान्य माणसांप्रतीचा तिरस्कार आणि कायद्याला कवडीचाही भाव न देण्याची वृत्ती उघड झाली आहे. गायकवाड यांची कृती पाहताना प्रश्न पडतो की, मग या देशातील गोरगरीब जनतेने काय करावे? जे दररोज सडलेले, किडेमुंग्यांनी भरलेले अन्न नाईलाजास्तव खातात. त्यांनी काय रोज कोणावर तरी हात उगारावा? गायकवाड यांनी जर खरंच अन्नाच्या दर्जावरून एवढा संताप दाखवला असेल, तर त्यांनी एकदा तरी शासकीय पोषण आहार योजनेंतर्गत आदिवासी व दुर्गम भागात दिल्या जाणार्‍या शाळेतील जेवणाचा अनुभव घ्यावा. विविध माध्यमांनी यावर वारंवार वृत्तांकन केले आहे. कधी पोळीवर अळ्या, कधी भाजीमध्ये सापळे, कधी तांदळात किडे तर कधी दुधात फंगल लागलेली स्थिती. अनेक वेळा मुलांना दिले जाणारे अन्न वासाने नाक मुरडायला लावणारे असते. कित्येक रिपोर्ट्‌समध्ये मुलांना विषबाधा झाल्याच्या घटना नोंदवल्या गेल्या आहेत. अशा वेळी त्या चिमुकल्यांनी काय करावे? गायकवाडसाहेबांप्रमाणे शिक्षकांना मारावे का? की त्या चिमुकल्यांनी आमदार निवास गाठून कोणालातरी बुक्क्यांचा प्रसाद द्यावा? शासकीय रेशन दुकानांमधून मिळणारे धान्यही याचाच भाग आहे. कधी किडाळलेला गहू, कधी दातात न बसणारा खडा तांदूळ, तर कधी निकृष्ट प्रतीची डाळ. गोरगरीब माणूस कित्येकदा तक्रार करत नाही. का? कारण त्याच्याकडे पर्यायच नसतो. गायकवाडसाहेबांना जर वासाने त्रास झाला असेल, तर त्यांनी हे धान्य घेऊन महिनाभर स्वतःच्या घरात शिजवून खावे. मग कळेल की, दुर्गंधी काय असते आणि संयम म्हणजे काय असतो. सरकारी योजनेतून मिळणारे अन्न असो, शासकीय रुग्णालयात मिळणार्‍या औषधांचा दर्जा असो, किंवा सार्वजनिक शौचालयांची असलेली घाणेरडी स्थिती.. सामान्य माणूस हे सगळे रोज सहन करतोय. तो मारामारी करत नाही. त्याचे सहन करणे म्हणजे कमकुवतपणा नव्हे, तर ही त्याची मजबुरी आहे आणि मोठ्या पदावरील व्यक्तींनी ती समजून घ्यायला हवी. गायकवाड यांनी जर स्वच्छतेचा आणि दर्जाचा एवढा आग्रह धरलाय, तर त्यांनी आधी स्वतःच्या विधानसभा क्षेत्रातील अंगणवाड्या, झोपडपट्ट्या, शासकीय दवाखाने आणि रेशन दुकानांना भेटून पाहावे. तेथे मिळणार्‍या सुविधा पाहिल्या की, कदाचित त्यांच्या संतापाचं स्वरूपच बदलेल. कदाचित ते त्या कर्मचार्‍यावर हात उचलण्याऐवजी त्या व्यवस्थेला प्रश्न विचारतील. पण तसे घडले नाही. उलट एक सामान्य श्रमिक जो पोटासाठी नोकरी करतो, त्याच्यावर हात उचलून गायकवाड यांनी दाखवून दिले की, सत्ताधारी लोक अजूनही 'मी कोण आहे माहीत आहे का?' अशा मानसिकतेत अडकलेत. जर एक लोकप्रतिनिधी चुकत असलेल्या व्यवस्थेवर काम करण्याऐवजी त्या व्यवस्थेतील सगळ्यात दुर्बल घटकावर राग काढत असेल, तर ही लोकशाहीची शोकांतिका आहे. एखाद्या कर्मचार्‍याने नासलेले अन्न दिले असेल, तर त्यामागे असलेली साखळी शोधून दोषींवर कारवाई करणे हे आमदाराचे कर्तव्य आहे, मारहाण करणे नव्हे. एकच लक्षात घ्यावे की, संताप ही वैयक्तिक प्रतिक्रिया असते, पण जेव्हा ती सार्वजनिक जबाबदारीवर असलेल्या माणसाकडून येते, तेव्हा तो संताप हिंसक रूप घेऊन लोकशाही मूल्यांची हत्या करतो. गायकवाड यांनी जे केले, ते नुसतेच एका कर्मचार्‍यावर अत्याचार करणारे नव्हते, तर ती संपूर्ण व्यवस्थेतील दबलेल्या वर्गावरची दडपशाही होती. हा वर्ग तोच आहे जो आपल्या मतांनी याच आमदारांना सत्तेवर आणतो. मग हाच वर्ग जेव्हा आपली सेवा देतो, तेव्हा त्याला बुकलून मारणे ही कृती अपराधाचीच आहे. त्यामुळे संजय गायकवाड यांचं वर्तन माफ केले जाऊ शकत नाही. त्यांच्यावर कठोर कारवाई झालीच पाहिजे, जेणेकरून इतर नेत्यांनाही हा इशारा मिळेल की सामान्य नागरिकांवर हात उगारणे, हे कुठल्याही परिस्थितीत मान्य केले जाणार नाही. आपण या प्रकाराला रोखले नाही, तर उद्या हीच मस्ती आपल्या मुलांवर, आपल्या घरावर, आपल्या अस्तित्वावर घाला घालेल. त्याआधीच जागे होणे गरजेचे आहे.

# यांच्या मनात अजून नेमके स्पष्ट नाही

**ठाकरे नावावर प्रेम करणारा मराठी माणूस मोठ्या आशेने ५ जुलैला वरळी डोम येथे हजारोंच्या संख्येने आला. यातील एकही माणूस पैसे देऊन, जेवणाच्या पाकिटाच्या लोभाने, थोडक्यात सांगायचे तर स्वतःच्या फायद्यासाठी आलेला नव्हता. त्यांच्या डोळ्यात आनंदाश्रू होते. मनात ठाकरे कुटुंब पुन्हा एका फ्रेममध्ये पाहायला मिळणार तो क्षण डोळ्यात साठवण्याची, मनात भरून घेण्याची निर्लेप इच्छा होती. वरळी डोम येथील आठ-नऊ हजार आसनक्षमता पूर्ण झाल्यानंतर प्रवेशद्वार बंद करण्यात आले. मात्र गेटच्या बाहेर असलेल्या मराठी माणसांच्या ठाकरे प्रेमापुढे, जनरेट्यापुढे ते लोखंडी गेटही तग धरू शकले नाही. गेट खाली पडल्यानंतर जो मराठी माणसांचा लोंढा आत शिरला त्याला फक्त दोन भावांना एकत्र आलेले पाहायचे होते.**

शिवसेनेचे सोनेरी दिवस आता मृगजळ राहिलेले नाही, ही भावना घेऊन जुने जाणते शिवसैनिकही त्या गर्दीत वाट काढत पुढे चालत होते. अंगावर शहारे आणणारा तो विजयोत्सव होता. मात्र अवघ्या तीनच दिवसांत ८ जुलै रोजी राज ठाकरेंच्या एका सोशल मीडिया पोस्टने मराठी जनांच्या मनात पुलकीत झालेल्या पालवीची पाने खुडली. राज ठाकरेंनी एक स्पष्ट आदेश काढला की 'पक्षातील कोणीही वर्तमानपत्रं, वृत्तवाहिन्या किंवा कोणत्याही डिजिटल माध्यमांशी संवाद साधायचा नाही.' यानंतर राज ठाकरे पुन्हा एकदा मौनात गेले आहेत.

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांचे एकाच वेळी एका मंचावर येणे, एकमेकांना आलिंगन देणे, दोघांच्या पत्नी, मुलांनी हातात हात घेत फोटोसाठी पोज देणे हा फक्त फोटोत्सव होता का, असा प्रश्न राज ठाकरेंच्या आदेशाने निर्माण झाला आहे. दुसरीकडे, शिवसेना (ठाकरे) खासदार आणि राज-उद्धव या दोघांनाही जवळून ओळखणारे संजय राऊत मात्र स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी एकत्र येऊन लढायला पाहिजेत, यासाठी जनतेचा दबाव असल्याचं सांगत आहेत. त्यासाठी ते पुन्हा एकदा त्याच ५ जुलैच्या मराठी विजयोत्सव मेळाव्याचा दाखला देत आहेत.

संजय राऊत हे युती तोडायची असेल किंवा युती करायची असले याची साखरपेरणी व्यवस्थित करतात. काही दिवसांपूर्वी राज ठाकरेंच्या निवासस्थानाला कॅफे म्हणणारे राऊत आता सन्माननीय राज साहेब असा उल्लेख करू लागले आहेत. राज आणि उद्धव यांनी एकत्र येऊन मुंबई महापालिकेसह सर्वच स्थानिक स्वराज्य संस्था लढल्या पाहिजेत, यासाठी जनतेचा दबाव असल्याचे ते आता सांगत आहेत. त्यासाठी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षासोबतची महाविकास आघाडी, इंडिया आघाडी सोडण्याचीही त्यांची तयारी दिसत आहे. इंडिया आघाडी आता अस्तित्वात नाही असं एकदा शरद पवारांनी म्हटलं होतं. आता संजय राऊतही तोच सूर आळवत आहेत.



इंडिया आघाडी लोकसभा निवडणुकीसाठी निर्माण झाली. आम्ही लोकसभेची निवडणूकही जिंकली. त्यानंतर मात्र इंडिया आघाडीची एकही बैठक झालेली नाही, असे आता राऊत सांगायला लागले आहेत. उद्धव ठाकरेंनी याची खंत व्यक्त केली होती, हे सांगायलाही ते विसरले नाहीत. एकूण काय तर इंडिया आघाडी लोकसभेसाठी होती. राष्ट्रीय मुद्द्यांवर आम्ही कधीही एकत्र येऊ हा सोयीचा मार्ग कायम ठेवून, आता इंडिया आघाडीची आवश्यकता संपली असल्याचे त्यांनी जाहीर करून टाकले. महाविकास आघाडीबद्दल मात्र ते असे करू शकलेले नाहीत.

विधिमंडळाचे अधिवेशन चालू आहे. तिन्ही पक्ष अजूनही विधिमंडळात एकत्र आहेत. त्यामुळेच राऊतांनी येथे सावध पवित्रा घेत, महाविकास आघाडीच्या नियमित बैठका होतात. महाविकास आघाडीचे सर्व निर्णय एकत्रित घेतले जातात. मात्र महानगरपालिका, जिल्हा परिषद, नगर पंचायत या स्थानिक स्वराज्य संस्थांचे गणित वेगळे आहे. येथे स्थानिक प्रश्नांवर आणि स्थानिक नेत्यांसोबत चर्चा करून युती-आघाडीचा निर्णय घेतला जातो. मनसे आणि शिवसेनेने (ठाकरे) एकत्र येऊन मुंबईसह राज्यातील सर्वच महापालिकांची निवडणूक एकत्र लढावी, असा जनतेचा दबाव असल्याचे राऊत म्हणत आहेत. पण तसा प्रतिसाद मनसेकडून मिळताना दिसत नाही.

संजय राऊत यांचे इंडिया आघाडी आणि महाविकास आघाडीबद्दलच्या वक्तव्याचा विचार केला तर राज ठाकरे यांनाच हा सूचक इशारा आहे. तुम्ही काँग्रेससोबत येण्यास तयार नसाल तर आम्हीदेखील काँग्रेससोबत जाऊ इच्छित नाही, असेच राऊत सूचवत आहेत. ५ जुलैच्या मेळाव्यापासून काँग्रेसदेखील दोन हात दूर राहिली. काँग्रेसविरहित डावे, शेतकरी कामगार पक्ष आणि काही रिपब्लिकन नेत्यांना सोबत घेण्याचा विचार ठाकरेंच्या शिवसेनेचा आहे. सध्या कुठेच नसलेले महादेव जानकर देखील या मेळाव्याला हजर होते. या मेळाव्यात सुप्रिया सुळेंचा उत्साह लपून राहिला नाही. दोन्ही ठाकरे बंधू एकत्र आले तर मुंबई महापालिकेत फारसे स्थान नसलेल्या शरद पवारांच्या राष्ट्रवादीलाही महत्त्व मिळण्याची यामागे गोळाबेरीज आहे.

राज ठाकरे स्वतः उद्धव ठाकरेंसोबतच्या युतीवर बोलायला तयार नाहीत आणि त्यांच्या पाठीराख्यांनाही त्यांनी दम भरला आहे की, कोणी ही बोलू नका. विजयी मेळाव्यातही राज यांनी त्यांचा तोल मराठी भाषेवरून इतरत्र ढळू दिला नाही. ज्या मोकळेपणाने उद्धव ठाकरे आणि त्यांच्या कुटुंबीयांनी राज यांना सोबत घेण्यासाठी हात पुढे केला तेवढा बिनधास्तपणा राज यांच्या भाषणात आणि देहबोलीतही नव्हता. राज ठाकरे यांचे सध्या भाजपसोबत सूत्र जुळलेले आहे. एकनाथ शिंदे यांच्यासोबतही त्यांचे अजून फार वाईट संबंध नाहीत. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकींनी बॅक फूटवर गेलेले राज ठाकरे मराठीचा मुद्दा आणि विजयी मेळाव्यामुळे फ्रंट फूटवर आले. ठाकरे बंधू एकत्र येण्याचे श्रेय त्यांनी देवेंद्र फडणवीसांना देऊन एकप्रकारे फडणवीसांबद्दल सकारात्मक भाषा केली. तर उद्धव ठाकरेंनी केलेला फडणवीसांचा उल्लेख हा तुच्छतेचा होता.

उद्धव ठाकरेंना शिवसेना फोडणाऱ्या, निशाणी चोरणाऱ्यांना नामोहरम होताना पाहायचे आहे. अमित शहांना मुंबई आणि महाराष्ट्रात जागोजागी धक्का देण्याची इच्छा आहे. मुंबई महापालिकेवर ठाकरेंच्याच शिवसेनेचा झेंडा उद्धव यांना हवा आहे. त्यासाठी ते संधी मिळेल तिथे राज आमच्यासोबत असल्याचे सांगत आहेत. मिरारोड येथील मनसेच्या मोर्चात ठाकरेंचे राजन विचारे सहभागी झाले. आझाद मैदानावरील गिरणी कामगारांच्या आंदोलनात मनसेचे बाळा नांदगावकर आणि स्वतः उद्धव ठाकरेही हजर राहिले. वरळीच्या विजयी मेळाव्यात दोन्ही भाऊ एकत्र आलेले पाहून बाळा नांदगावकर यांच्या तोंडातून शब्द फुटत नव्हते. त्यांचे डोळेच काय ते बोलत होते. आता त्यांच्या नेत्यांनी त्यांचे शब्दच गोठवून टाकले.

राज ठाकरे यांनी लोकसभेत भाजपला बिनशर्त पाठिंबा दिला. विधानसभेत त्यांना भाजप आणि शिंदेंच्या शिवसेनेने साथ दिली नाही. राज ठाकरेंचा मुलगाही पहिल्याच निवडणुकीत पराभूत झाला. तरीही राज ठाकरे भाजप आणि शिंदेबद्दल ठाकरी शैलीत बोलायला तयार नाही. भाजपबद्दल असलेला त्यांचा सॉफ्ट कॉर्नर त्यांच्या अनेक छोट्या-मोठ्या मुलाखतींमधून झळकत असतो. भाजप नेत्यांशी माझी नैसर्गिक मैत्री आहे. राजकारणात आलो तेव्हापासून भाजपसोबतच आमच्या (तत्कालीन शिवसेना) पक्षाची युती होती. त्यामुळे त्यांच्यासोबत अधिक कम्फर्टेबल असतो. दुसरा मुद्दा विचारधारेचा, तिथेही दोघांची नाळ जुळते.

शिंदेंची शिवसेना आज भाजपसोबत असली तरी राज ठाकरेंना मोठं करून त्यांना सोबत घेणं भाजपला कधीही फायद्याचं आहे. यातून भाजप एका दगडात दोन पक्षी मारणार. आज तरी हा सगळा शक्यतांचाच खेळ आहे. कारण आपण नेमकी कुठली भूमिका घ्यावी, हे राज ठाकरे यांच्या मनात अजून नेमके स्पष्ट झालेले नाही, असेच त्यांचा सध्याचा पवित्रा पाहिल्यावर दिसत आहे. दुसऱ्या बाजूला उद्धव ठाकरे प्रवक्ते संजय राऊत यांच्या माध्यमातून सतत राज यांनी आपल्यासोबत येण्यासाठी पोषक वातावरण तयार करू पाहत आहेत. स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकीत इंडिया आघाडी आणि महाविकास आघाडीची गरज नाही, इथपर्यंत राऊत यांचा आत्मविश्वास वाढला आहे, पण राज ठाकरे सध्या तरी वेट आणि वॉचच्या भूमिकेत दिसत आहेत.

## अनास्थेचा 'व्हायरस'

केवळ देशभरातच नव्हे, तर संपूर्ण जगभरात हिंजवडीतील 'राजीव गांधी इन्फोटेक पार्क'ने पुणे आणि परिसराची ओळख अधिक ठळक केली. दुर्दैवाने, गेल्या काही महिन्यांत याच हिंजवडीतील समस्या तेवढ्याच ठळकपणे समोर येत आहेत. या समस्या नव्या नाहीत. त्या वेळेवर सोडविण्यात आलेले अपयश, हा कळीचा मुद्दा आहे. २५-३० वर्षांपूर्वी हिंजवडीचा पहिला टप्पा कार्यान्वित झाला. त्यानंतर तीन टप्प्यांत त्याचा विस्तार झाला. हजारो कंपन्या आणि लाखो कर्मचाऱ्यांसाठी हिंजवडी हे जणू दुसरे घरच झाले. आयटी कंपनीतील थेट रोजगारासह इतर अनेक पूरक उद्योग आणि स्थानिकांना व्यवसायाची संधी मिळाली. मात्र, कंपन्या व कर्मचाऱ्यांची संख्या वाढत असताना, सरकारी यंत्रणांनी येथील मनुष्यबळाला आणि स्थानिक रहिवाशांना चांगल्या सुविधा मिळाव्यात, यासाठी फारसे प्रयत्न केले नाहीत. हिंजवडीला जाणारा मुख्य रस्ता वाकडमार्गे जातो. हिंजवडीच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या टप्प्याचा विस्तार झाला तेव्हाच पर्यायी रस्ते विकसित व्हायला हवे होते. हे वेळीच झाले असते, तर बहुतांश समस्या दूर झाल्या असत्या. हिंजवडी विकसित झाली, परिसराचे चित्र बदलले; पण रस्ते आणि इतर पायाभूत सुविधांसाठी स्थानिक ग्रामस्थ व आयटी कर्मचाऱ्यांना कायमच संघर्ष करावा लागला आहे. सार्वजनिक वाहतूक सेवेपासून ते चांगल्या खड्डेमुक्त रस्त्यांपर्यंतच्या अनेक मागण्यांसाठी आज एवढ्या वर्षानंतरही आंदोलन करावे लागते, निवेदन द्यावे लागते, हीच शोकांतिका आहे. एवढा मोठा औद्योगिक परिसर असतानाही, येथील वीजवाहिन्यांमध्ये वारंवार बिघाड होत असतात. ते दुरुस्त करण्यासाठी लागणारा तीन दिवसांचा कालावधी सध्याच्या युगात निश्चितच भूषणावह नाही. हिंजवडीत काम करणाऱ्या सरकारी यंत्रणा आणि त्यांच्यातील (नसलेला) समन्वय हा भविष्यात पीएचडीच्या संशोधनाचा विषय होऊ शकेल. हा अनास्थेचा 'व्हायरस' आहे.

# काँग्रेसची सावध भूमिका

केंद्र सरकारच्या त्रिभाषा सूत्राचा अवलंब करून महाराष्ट्रात पहिलीपासून मराठी भाषा शिकविण्याचा शासनादेश राज्यातील महायुती सरकारने मागे घेतला. महाराष्ट्रात पाचवीपासून हिंदी भाषा शिकवली जाते, असे असताना मुलांना ती भाषा पहिलीपासून शिकण्याची गरज काय, असा सवाल राज्यातील अनेक भाषातज्ज्ञ आणि शिक्षकांनी उपस्थित केला. त्यानंतर तिर्सया भाषेची सक्ती ही केवळ महाराष्ट्रात का, हिंदी भाषिक राज्यांमध्ये तुम्ही तिसरी भाषा कुठली देणार आहात, असा सवाल उपस्थित केला जाऊ लागला. त्यातसोबत दक्षिण भारतातील राज्यांनी पहिलीपासून हिंदी शिकवणे अमान्य केले. महाराष्ट्रात या हिंदी भाषेच्या सक्तीच्या विरोधात सगळेच विरोधी पक्ष महायुती सरकारच्या आणि विशेषतः भाजपच्या विरोधात मैदानात उतरले. सगळ्यांनीच सत्ताधार्‍यांना धारेवर धरले. मराठी अभ्यास केंद्राचे अध्यक्ष डॉ. दीपक पवार यांच्यासारख्या भाषा तज्ज्ञाने हिंदी भाषेची सक्ती ही भविष्यकाळात मराठी भाषेला कशी मारक आहे, हे पटवून सांगितले. मराठी शाळा टिकल्या पाहिजेत, हा समाज माध्यमांवरील लाखो मराठीप्रेमींचा समूह, अनेक मराठी प्रेमी संघटना आणि मराठी जनता सरकारच्या हिंदी लागू करण्याच्या धोरणाविरोधात संतप्त झाली होती. विशेषतः महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी हिंदी सक्तीविरोधात प्रथम राजकीय पातळीवरून सडेतोड भूमिका घेतली. त्यामुळे राज्यातील वातावरण तापू लागले. त्यानंतर उद्धव ठाकरे या लढ्यात उतरले. त्यानंतर राज्यातील सगळेच राजकीय पक्ष या मेळाव्यात सहभागी होत असताना राज्यातील काँग्रेस नेत्यांनीही सरकारच्या हिंदी सक्तीला विरोध केला.

महाराष्ट्रातील काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी राज्य आणि केंद्र सरकारच्या हिंदी लागू करण्याच्या धोरणाच्या विरोधात जोरदार भूमिका घेतली. राज्यात हिंदी विरोधात तापत जाणारे वातावरण आणि पावसाळ्यानंतर होर्णाया स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा विचार करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिंदी भाषा लागू करण्याचे दोन शासनादेश



(जीआर) रद्द केले. मराठी भाषिकांकडून जो मोर्चा निघणार होता, तो न घेता वरळी डोम येथे राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली ५ जुलैला विजयी मेळावा घेण्यात आला. यावेळी दोन्ही ठाकरे बंधू हे १९ वर्षांनंतर एकाच विषयासाठी एकाच व्यासपीठावर आले. त्यामुळे तो मराठी माणसांचा कुतूहलाचा विषय होता. या विजयी मेळाव्यासाठी विविध पक्षांचे नेते आले होते. पण यामध्ये हिंदी विरोधात सत्ताधार्‍यांचा जोरदार विरोध करणारे आणि राज्यातील प्रमुख पक्ष असलेल्या काँग्रेसचा राज्यातील कुणी नेता सहभागी झाला नव्हता. काँग्रेसचे माजी खासदार भालचंद्र मुनगेकर यांना बहुतेक काँग्रेसने पाठवून दिलेले असावे. त्यामुळे हिंदी विरोधाच्या ठाकरेंचे नेतृत्व असलेल्या या मेळाव्यात सहभागी होण्याबाबत काँग्रेसने सावध भूमिका घेतलेली दिसते. ठाकरे बंधूंच्या नेतृत्वाखाली झालेल्या या मेळाव्याला प्रचंड प्रतिसाद मिळाला होता, त्यामुळे या मेळाव्यात संयुक्त महाराष्ट्र लढ्यातील झलक दिसून आली. त्यावेळी केंद्रातील आणि राज्यातील काँग्रेसचे नेते त्यावेळी त्या लढ्याच्या विरोधात होते. कारण केंद्रात काँग्रेसचे सरकार होते. आता जी राज्यातील भाजप नेत्यांची अवस्था झालेली आहे, तशीच त्यावेळी राज्यातील काँग्रेसच्या नेत्यांची झालेली होती. कारण आपण मराठी असलो तरी आपल्या केंद्रातील नेत्यांच्या विरोधात भूमिका घेता येत नाही. त्यामुळे इकडे आड आणि तिकडे विहीर अशी त्यांची स्थिती झाली होती.

केंद्रातील आणि राज्यातील भाजपविरोधात भूमिका घेता येते म्हणून काँग्रेसचे राज्यातील नेते हिंदीविरोधात बाह्या सरसावून तयार झाले. त्यांनी भाजपवर टीकास्त्र सोडली. ते कसे मराठीच्या विरोधात आहेत, अशी शेरेबाजी केली. पण प्रत्यक्षात जेव्हा कुठलाही झेंडा न घेता केवळ मराठीचा अजेंडा घेऊन वरळी डोममध्ये विजयी मेळावा घेण्यात आला, त्यावेळी त्या विजयात सहभागी होण्यासाठी राज्यातील एकही नेता गेला नाही. यावरून काँग्रेसला मराठीविषयी फार काही प्रेम नाही, हेच त्यांनी दाखवून दिले. कारण आम्ही राष्ट्रीय पक्ष असल्यामुळे आम्ही हिंदीचा विरोध कसा करणार अशी त्यांची पंचाईत झाली असावी. त्यात पुन्हा लवकरच बिहारची विधानसभा निवडणूक आहे, त्यामुळे आपल्याला ठाकरे मंडळींसोबत जाऊ हिंदी विरोध करणे परवडणारे नाही, हे त्यांनी लक्षात घेतले असावे. तुम्हाला जर मराठीबद्दल प्रेम वाटते, तर तुम्ही इतर पक्षांसोबत वरळी डोम येथील विजयी मेळाव्यात का, सहभागी झाला नाहीत, या प्रश्नाचे उत्तर काँग्रेसच्या नेत्यांकडे नाही. मुळात जेव्हा राज्यात २०१९ साली महाविकास आघाडी स्थापन झाली तेव्हा त्यात शिवसेनेचा सहभाग असल्यामुळे काँग्रेस सहभागी व्हायला तयार नव्हती. कारण शिवसेनेला ते प्रांतवादी पक्ष म्हणतात. त्यामुळे त्यांच्यासोबत आघाडीत सहभागी झालो तर त्याचा फटका राष्ट्रीय पातळीवर बसण्याची भीती होती. त्यामुळे सोनिया गांधी तयार नव्हत्या. पुढे त्या बाहेरून पाठिंबा देण्यासाठी तयार झाल्या, पण बाहेरून पाठिंबा देऊन सत्ता मिळणार नाही, असे राज्यातील नेत्यांचे म्हणणे होते. त्यामुळे ते सत्तेत सहभागी झाले. आता शिवसेनेच्या नेतृत्वाखालील हिंदी विरोधी मेळाव्यामध्ये सहभागी झाले तर आपले नुकसान होईल, असे वाटत असल्यामुळेच ठाकरेंच्या नेतृत्वखाली एकत्र येण्यापासून ते दूर राहिले असावेत.

## महत्त्वाकांक्षी मस्क

जगातील सर्वांत श्रीमंत व्यक्ती असलेले अमेरिकेतील उद्योगपती एलन मस्क यांनी आता 'अमेरिका पार्टी' या नव्या पक्षाची स्थापना करण्याची घोषणा केली आहे. प्रामुख्याने द्विपक्षीय लोकशाही असलेल्या अमेरिकेत यापूर्वीही तिसऱ्या पक्षाच्या रूपाने 'समांतर तिसरी ताकद' उभारण्याचा प्रयत्न लेबर पार्टी, ग्रीन पार्टी यांनी केला आहे. मात्र, त्यात त्यांना फार यश आलेले नाही. आता मस्क त्यांच्याकडे असलेल्या प्रचंड संपत्तीच्या जोरावर या तिसऱ्या पक्षाचा कारभार उभा करतीलही; मात्र अमेरिकी जनमानस त्यांना कसा प्रतिसाद देते, हे आगामी काळातच कळू शकेल. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना आत्ता निवडून आणण्यात मस्क आणि त्यांच्या 'एक्स' या प्रभावशाली समाजमाध्यमाचा मोठा वाटा आहे, हे ट्रम्पही नाकारत नाहीत. निवडून आल्यावर ट्रम्प यांनी मस्क यांना नेहमीच्या परंपरा मोडून मोठे अधिकारपदही दिले. सुरुवातीचे नव्याचे नऊ दिवस सरल्यावर मात्र दोघांत खटके उडू लागले. 'एक्स'वर लहान मुलांसारखे भांडून झाले; उखाळ्यापाखाळ्याही काढून झाल्या. एकूणच ट्रम्प आणि मस्क यांचे हे वागणे पाहून त्यांचे कोणतेही कृत्य वा घोषणा किती गांभीर्याने घ्यायची हा प्रश्नच आहे.



आताचे ताजे भांडण वा वाद हे ट्रम्प यांच्या महत्त्वाकांक्षी 'वन बिग ब्युटिफूल' विधेयकामुळे आहे. या विधेयकाद्वारे ट्रम्प इतर अनेक गोष्टींसोबत हरितऊर्जेसाठी देऊ केलेली सवलत कमी करू इच्छितात. हे थेट मस्क यांच्या 'टेस्ला' या इलेक्ट्रिक कारच्या व्यवसायाच्या मुळावर येणारे आहे. याशिवाय अमेरिकी सरकारला घेता येण्याच्या कर्जमर्यादेतही ट्रम्प वाढ करू इच्छितात. असे केल्यास अमेरिका कर्जबाजारी होईल, दिवाळखोरीत जाईल आणि लाखो जण बेरोजगार होतील, असे मस्क यांचे म्हणणे आहे. ट्रम्प यांना ही असली विधेयके मंजूर करण्यापासून रोखण्यासाठी सिनेट आणि प्रतिनिधिगृहात आपले मोजके प्रतिनिधी निवडून आणायचे ही मस्क यांची प्राथमिक योजना आहे. डेमोक्रॅट व रिपब्लिकन यांचे संख्याबळ दोन्ही सभागृहांत जवळपास समसमान आहे. हे दोन्ही पक्ष एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, असे मस्क यांना वाटते. त्यामुळे दोन्ही सभागृहांत आपले मोजके प्रतिनिधी जरी असले तरी ते भविष्यात असली विधेयके हाणून पाडू शकतील, असे मस्क यांना वाटते. अर्थात ही वाटचाल सोपी नाही. मात्र, प्रचंड संपत्तीच्या जोरावर बाळगलेल्या या महत्त्वाकांक्षेपुढे कोण काय बोलणार?




इराण-इस्त्रायल युद्धात अलीकडेच अमेरिका उतरली होती. इस्त्रायलने सुरुवातीला हल्ले केले तेव्हा इराणमधील युवा पिढी ते क्षण मोबाइलमध्ये बंदिस्त करत होती, कुठे तरुण मुली गाडीच्या टपावर चढून हिजाबमुक्त होऊन 'बाराये'च्या सुरावर नाचत होत्या. दुसरीकडे इस्त्रायलमधील तरुण पिढी मोबाइलद्वारे त्यांना संदेश धाडत होती, की हे युद्ध तुमच्याविरोधी नाही. तिसरीकडे इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी इराणी नागरिकांना 'हे युद्ध तुमच्या स्वातंत्र्यासाठी आहे, उठाव करण्यासाठी सज्ज व्हा,' असा सल्ला दिला होता. चौथे म्हणजे इराणमधील इस्लामवादी कट्टरपंथीय सरकारच्या दडपशाहीच्या विरोधात आवाज उठवणाऱ्या व तुरुंगवास भोगलेल्या नोबेल पुरस्कारप्राप्त विचारवंतांनी 'युद्ध थांबवा' अशी हाक दिली होती आणि राजकीय सत्तेने पायउतार व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली होती. या परिस्थितीत इराणमधील सरकार आपला कट्टरपंथ सोडत नसल्याचे चित्र आहे. 'इराणची अण्वस्त्रसज्जता व आंतरराष्ट्रीय राजकारण' हे थोडे बाजूला ठेवून इराणमधील आजघडीचे नागरी चित्र समजून घेण्यासारखे आहे. यासाठी 'झान, झेंदगे, आझादी' (जिन, जियान, आझादी) आणि 'बाराये'कडे वळावे लागेल. इराणमधील वांशिक संघर्षातील कुर्द नागरिकांची ही घोषणा आता सगळ्याच इराणी नागरिकांची घोषणा बनली आहे. इराणमध्ये प्रामुख्याने पर्शियन, अझरबैझानी आणि कुर्द नागरिक आहेत. पर्शियन आणि अझरबैझानी यांच्या चालीरीतींमध्ये काही साधर्म्य आहे. सरकार पर्शियन व कुर्द नागरिकांमध्ये भेदभाव करत असते, असा आरोप सरकारवर केला जातो. इस्लामिक क्रांतीनंतर स्थापन झालेल्या कट्टरपंथी सरकारची धोरणे नागरी स्वातंत्र्याचा गळा घोटणारी आहेत; ती झुगारता येत नाहीत आणि सरकार हटवता येत नाही, अशी नागरिकांची कोंडी आहे. विशेषतः, महिलांच्या अधिकारांची गळचेपी आणि महिलांना हिजाब परिधान करण्याची सक्ती यावरून तेथील नागरिक सरकारच्या विरोधात सतत उभे ठाकत असतात. इराणमधील तुरुंग अशा निदर्शक नागरिकांनी भरलेले असतात. इराणमधील महिला हक्क चळवळीवर सुरुवातीच्या काळात पाश्चिमात्य देशांमध्ये झालेल्या महिला हक्क चळवळीचा प्रभाव होता. त्यानंतर महिलांच्या अधिकारासाठी १९९०च्या दशकात कायदेतज्ज्ञ शिरीन ईबादी (२००३मधील'नोबेल' विजेत्या) २००६ मध्ये परवीन अर्दलान (वन मिलियन सिग्नेचर कॅम्पेन) आणि नार्गेस मोहमदी (२०२३मधील 'नोबेल' विजेत्या) यांनी मोठे प्रयत्न केले होते. परिणामी महिलांवरील अन्याय, अत्याचार यांबाबत मोठ्या प्रमाणावर चर्चा झडू लागली. लक्षात घेण्यासारखे असे, की पाश्चात्त्य देशांचा प्रभाव असतानाही तेथील स्त्री अधिकाराची चळवळ 'स्त्री' विरुद्ध 'पुरुष' याकडे न जाता, स्त्री-पुरुष सहकार्याने धर्मसत्तेच्या दडपशाहीच्या विरोधात उभी ठाकली आहे. सरकारच्या धार्मिक दडपशाहीला त्रासलेले आणि महिलांच्या अधिकारांसाठी झगडणारे अनेक तरुण, पुरुष तिथे पुढे आले. हळूहळू या चळवळीत समाजाशी संबंधित अन्य विषयांचा समावेश झाला. सरकारला विरोध म्हणून ती अधिक जोमाने कार्यरत होऊ लागली. त्यामुळे एका अर्थाने काही प्रमाणात ही 'नागरी चळवळ' म्हणून पुढे आलेली दिसते. या चळवळीचा धागा जोडला जातो, तो २०२२ मधील एका घटनेशी. सरकारला अपेक्षित अशा योग्य पद्धतीने हिजाब परिधान केला नाही म्हणून माहसा अमिनी या कुर्द तरुणीला अटक करण्यात आली आणि दुसऱ्या दिवशी एका रुग्णालयात तिचा मृत्यू झाला. माध्यमांनी हे प्रकरण उचलून धरले तेव्हा सरकारने घटनेची चौकशी केली नाहीच, उलट संबंधित पत्रकारांना तुरुंगात डांबले. यानंतर तेथे सरकारच्या विरोधात मोठ्या प्रमाणावर निदर्शने झाली. तेव्हा इराणमधील वांशिक संघर्षातील कुर्द नागरिकांची 'झान, झेंदगे, आझादी' (महिला, जीवन, स्वातंत्र्य) ही घोषणा सर्वच इराणी नागरिकांनी उचलून धरली. आंदोलकांना पाठिंबा म्हणून संगीतकार शेरविन हजीपोर यांनी 'बाराये' हे काव्य रचले. 'बाराये' म्हणजे 'तुझ्यासाठी/तुमच्यासाठी'. हे गीत तरुणी व महिलांसाठी आहे, तसेच सर्व नागरिकांच्या स्वातंत्र्यासाठी! ते आहे आर्थिक प्रगतीसाठी; तसेच प्रदूषण रोखण्यासाठी! ते आहे मनामनांतील दुःख दूर व्हावे यासाठी, तसेच निरागसांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्यासाठी! नागरिकांचे स्वातंत्र्य दडपणाऱ्या धार्मिक कट्टरतेची काळरात्र संपावी आणि जगाबरोबर राहण्यासाठी प्रकाशाची सोनेरी किरणे पसरावीत यासाठी! त्यामुळे सर्वांच्याच, विशेषतः तरुणाईच्या मनांत हे गीत फुलले. २०२२मधील या घटनेनंतर आजघडीपर्यंत इराणमध्ये सरकारविरोधी निदर्शने चालूच राहिली.

# गुजराती समोसा

**साहित्य सारणासाठी :** एक कप भिजवलेले पोहे, मिक्स भाज्या, बटाटा, गाजर, बीन्स, फ्लॉवर, सिमला मिरची, एक टेबलस्पून तीळ, हिंग, मोहरीची फोडणी, धने-जिरेपूड, आलं, हिरवी मिरची वाटून, लिंबाचा रस, साखर, मीठ, तिखट.

**कृती :** फोडणी बनवा. त्यात आलं, मिरच्या तीळ घाला. वाफवलेल्या भाज्या घाला. पोहे घाला. गार झाल्यावर धने-जिरेपूड, मीठ, साखर, लिंबाचा रस, कोथिंबीर घाला.

**कव्हरसाठी :** दोन कप मैदा, अर्धा चमचा बेकिंग पावडर, मीठ चवीनुसार, अंदाजाने तूप घालून घट्ट भिजवा. नेहमीप्रमाणे सारण भरून समोसे बनवून तळा. तेलात तळा. खजुराच्या चणीबरोबर द्या. त्यासाठी पाव किलो खजूर, शंभर ग्रॅम चिंच, थोडा गुळ, धने-जिरेपूड, तिखट, मीठ सर्व उकळून गाळून घ्या.



# गुलाबपाणी : केसांना सतेज करणारा नैसर्गिक उपाय!

गुलाबाची मोहकता आणि मंद सुगंध नेहमीच आपला मूड तत्काळ रिफ्रेश करायला मदत करतो. पण केवळ बुकेमध्ये किंवा गजरा आणि हारांपुरताच फुलांचा वापर नसतो. गुलाब हे फूल जितके मोहक दिसते तितकेच त्याचे आरोग्यदायी फायदेदेखील आहेत.

**सौंदर्य** खुलवण्यासाठीदेखील गुलाब फायदेशीर ठरते. त्यामधील मॉइश्चरायझिंग घटक, टोनिंग करण्याची क्षमता त्वचेमधील दाह कमी करून त्वचेला सतेज बनवते. गुलाबाचे आरोग्यदायी गुणधर्म, सौंदर्य खुलवण्याची क्षमता यासोबतीने केसांचीही चमक वाढवण्यासाठी फायदा होतो हे तुम्हाला ठाऊक आहे का? म्हणूनच केसांचे आरोग्य जपण्यासाठी ब्युटी एक्स्पर्ट दिलेला हा खास सल्ला नक्की जाणून घ्या.




**गुलाबपाणी कसे ठरते फायदेशीर?**

गुलाबाच्या पाकळ्या पाण्यात मिसळून लावल्यास त्वचेला हायड्रेट करतात, पण त्यासोबतच त्वचेला सतेज करण्यास, मॉईश्चराईज्ड करण्यास मदत करतात. मात्र गुलाबाच्या पाकळ्या पाण्यात मिसळून केसांना लावल्यास टाळूवरील अतिरिक्त तेल प्रमाणात राहण्यास मदत होते. सोबतच टाळूवरील pH balance राखण्यास मदत होते. यासोबतच व्हिटॅमिन्स, मिनरल्स आणि ॲण्टीऑक्सिडंट घटक यांचा मुबलक साठा असतो. गुलाबातील इसेन्शियल ऑईल शुष्क त्वचेची समस्या आटोक्यात ठेवण्यास मदत करते. त्यामुळे शाम्पूसोबत त्याचा वापर केल्यास टाळूवरील त्वचा मॉईश्चराईज्ड होण्यास मदत होते तसेच हेअर फोलिकल्स मजबूत होतात.



**फ्रिझी आणि निस्तेज केसांवर कशाप्रकारे वापराल गुलाब पाणी?**

**निस्तेज केसांसाठी**

केसांवर कर्लिंग आयर्न किंवा ब्लो ड्रायर वापरत असाल तर केसांचे नुकसान होते. केस अधिक शुष्क होतात. केसांना पुन्हा सतेज करण्यासाठी गुलाबपाणी फायदेशीर ठरते. याकरिता जोजोबा ऑईलमध्ये गुलाबपाणी मिसळा. या मिश्रणाने टाळूवर हलकासा मसाज करा.

मसाज केल्यानंतर सुमारे १० मिनिटांनंतर कोमट पाण्याने केस स्वच्छ धुवावेत. या उपायाने केसांचे नुकसान आटोक्यात ठेवण्यास मदत होते. कर्लिंग आयर्न किंवा ब्लो ड्रायरमुळे केस खराब झाल्यास हा उपचार फायदेशीर ठरतो.

**फ्रिझी हेअर**

फ्रिझी हेअरचा त्रास आटोक्यात ठेवण्यासाठी गुलाबपाण्यासोबत कोरफडीचा गर मिसळा. हे मिश्रण एकत्र करून टाळूवर हलकासा मसाज करा. सुमारे ३० मिनिटांनंतर पाण्याने केस स्वच्छ धुवावेत.

# दररोज जेवणात टाका चिमूटभर हिंग, कधी होणार नाही हे ५ आजार

भारतीय जेवणात स्वाद आणि सुगंध वाढवण्यासाठी हिंगाची फोडणी दिली जाते. हिंगाचा सुवास तेज आणि जेवण्याची इच्छा जागृत करणारा असतो. आयुर्वेदात देखील याचे अनेक फायदे सांगितले गेले आहेत. आपण दररोज चिमूटभर हिंग वापराल तर अनेक आजारांपासून मुक्ती मिळू शकेल. हिंग पोट, लिव्हर आणि डोळ्यासाठी फायदेशीर ठरतो. जाणून घ्या रोज हिंगाचे सेवन केल्याने आरोग्यावर काय प्रभाव पडेल.



**पोटासंबंधी आजार**

हिंग पोटासाठी अत्यंत फायदेशीर आहे. दररोज हिंगाचे सेवन केल्याने पोटासंबंधी समस्या जसे अपचन, गॅस सारख्या समस्या दूर होतात. याने पोटात गॅस, पोटातील किडे, मरोड आणि पोटासंबंधी सर्व वेदनांपासून मुक्ती मिळते.

**बीपीची समस्या**

हिंगात रक्त पातळ करण्याचे गुण असतात. म्हणून हे ब्लड प्रेशरच्या आजाराने त्रस्त लोकांसाठी फायदेशीर आहे. याने नसांमध्ये ब्लड क्लॉटिंग सारखी समस्या होत नाही ज्याने ब्लड प्रेशर अनियंत्रित होण्यापासून मुक्ती मिळते.

**श्वासासंबंधी आजार**

खोकल्याची समस्या असल्यास हिंगाचे सेवन फायदेशीर आहे. हिंग सामान्य खोकला, कोरडा खोकला, इंफ्लूएंजा, ब्रोन्काइटिस आणि दमा सारख्या आजारापासून दूर ठेवतं. डाळ, सांभार आणि भाज्यामध्ये हिंग वापरलं जाऊ शकतं. श्वासासंबंधी आजार असल्यास हिंगात जरासं पाणी मिसळून छातीला लावल्याने आराम मिळतो. याव्यतिरिक्त खोकला आणि दमा सारख्या आजारात आपण हिंगात मध मिसळून सेवन करू शकता.

**मासिक धर्म**

अनेक महिलांना मासिक धर्म दरम्यान वेदना सहन कराव्या लागतात. दररोज हिंगाचे सेवन केल्याने या दरम्यान होणाऱ्या वेदनांपासून मुक्ती मिळते.

हिंग प्रोजेस्ट्रॉन हार्मोन्स उत्पादनात मदत करतं, ज्याने ब्लड फ्लो सुरळीत राहतं. पीरियड्सदरम्यान वेदनापासून मुक्तीसाठी एक ग्लास ताकात २ चिमूट काळं मीठ आणि १ चिमूट हिंग मिसळून प्यावं.

**डोकेदुखी**

हिंगात शरीरातील आंतरिक सूज कमी करण्याची क्षमता असते. साधारणतः डोक्यातील आर्ट्रिजमध्ये सूज असल्यामुळे डोकेदुखीचा त्रास सहन करावा लागतो.

अशात रोज हिंगाचे सेवन केल्याने डोकेदुखीपासून मुक्ती मिळू शकते. डोकेदुखीचे प्रमाण अधिक असल्यास एका ग्लासात २ चिमूट हिंग उकळून घ्या. कोमट झाल्यावर दिवसातून दोनदा प्यावे.

# अनशापोटी करा गुळाचे सेवन

**अनशापोटी गूळ खाल्ल्यास ४ फायदे होतात. आपल्यापैकी बहुतेक लोक रात्री जेवल्यानंतर गूळ खातात. त्यामुळे जेवण पचण्यास मदत होते. अनशापोटी गूळ खाल्ल्यावर कोमट पाणी प्यायल्यास त्याचे आरोग्यासाठी अनेक फायदे असतात.**

**रक्तदाब नियंत्रणात राहातो :** रक्तदाब नियंत्रणासाठी गूळ प्रभावी ठरतो. गुळामध्ये भरपूर प्रमाणात कॅल्शिअम आणि फॉस्फरस आढळते. हे हाडांच्या मजबुतीसाठी आवश्यक आहेत. गुळाबरोबर आले सेवन केल्यास सांधेदुखीपासून मुक्ती मिळते.



**रक्त साफ होते :** सकाळी अनशापोटी गूळ खाऊन कोमट पाणी प्यायल्यास रक्त स्वच्छ होते. त्यामुळे नवीन रक्त तयार होते. हृदयरोग होण्याचा धोका दूर ठेवण्यासही गुळाच्या सेवनाचा फायदा होता.

**शरीराला मिळते ताकद :** गुळाच्या नियमित सेवनाने शरीर ताकदवान होते. दिवसभराचा थकवा दूर होण्यासही मदत होते. शरीरात ऊर्जा पातळी कायम राहाते आणि ती कमी होत नाही.

**पचनसंस्था मजबूत होते :** ज्या लोकांना आहार सहजपणे पचवण्यात अडचणी येतात त्यांनी गूळ आणि गरम पाणी सेवन करावे. या व्यक्तींसाठी ते औषधासारखे कामकरते. त्याचबरोबर बद्धकोष्ठता, पोटात वायू होणे, ॲसिडीटीसारख्या समस्यांपासून सुटका होण्यास मदत होते.

# 'या' चुका टाळल्या तर लग्नात वधूचा मेकअप होणार नाही खराब!



**घरात लग्नकार्य असलं की कामाची नुसती लगबग सुरू असते. धावपळ, धांदल असा सगळा माहोल असतो. मात्र अशा वातावरणातही एक आनंद, उत्साह असतो. लग्न म्हणजे दोन जिवांचंच नव्हे तर दोन कुटुंबांचं मीलन असतं. त्यामुळे हा दिवस घरातल्या प्रत्येकासाठी खास असतो. त्यातच वधू-वरांचा थाट तर काही औरच असतो. प्रत्येकाचं लक्ष या दोघांकडेच वेधलेलं असतं. लग्नात आलेल्या पाहूण्यांच्या नजरा, कॅमेरा हे जणू वधू-वरांकडेच केंद्रित झालेले असतात. त्यामुळे लग्नात सुंदर दिसण्यावर या दोघांचाही भर असतो. त्यातच वधू असेल तर विचारायलाच नको. अगदी साड्यांपासून मेकअपपर्यंत प्रत्येक गोष्ट खास असण्यावर तिचा भर असतो. मेकअपमुळे सौंदर्यात भर पडतेच. मात्र बऱ्याच वेळा उत्तम प्रतीच्या मेकअपचं सामान वापरूनही तो मेकअप नीट सेट होत नाही किंवा ऐनवेळी तो खराब दिसून लागतो. हे असं का होतं यामागे बरीच कारणं आहेत. यामध्ये आपल्या बदललेल्या जीवनशैलीचादेखील समावेश आहे.**

**हेअर कलर :** बदलत्या काळानुसार रोज नवनवी ट्रेंड बाजारात येत असतात. सध्या तरुणाईमध्ये हेअर कलर करण्याची क्रेझ दिसून येत आहे. त्यामुळे बऱ्याच तरुणी वेगवेगळ्या रंगांनी केस कलर करत असतात. पण काही वेळेस उत्सुक होऊन केलेला हेअर कलर त्यांचा चेहऱ्याला शोभून दिसत नाही. त्यामुळे लग्नासाठीचा लुक खराब होऊ शकतो. हेअर कलर व्यवस्थित सेटल होण्यासाठी १० ते १५ दिवस लागतात. त्यामुळे लग्नाच्या ४ ते ५ दिवस आधी हेअर कलर केल्यास जो लूक आपल्याला अपेक्षित आहे तो मिळणार नाही. म्हणूनच लग्नापूर्वी जर केस कलर करायचे असतील तर निदान महिनाभर आधी कलर करावेत.



**हेअरकट :** हेअर कलरप्रमाणे हेअरकट देखील लग्नाच्या ४-५ दिवस आधी करू नये. कधी कधी हेअरकट आपल्याला हवा तसा होतं नाही किंवा तो ब्रायडल लूकला साजेसा नसतो. त्यामुळे लग्नात हेअरस्टाइल करताना अडचणी येऊ शकतात. त्यामुळे महिनाभर आधी हेअरकट केल्यास ते चांगले ठरते.


**लग्नापूर्वी सुंदर दिसण्यासाठी केलेले उपाय :** लग्नात सुंदर दिसावं ही प्रत्येक तरुणीची इच्छा असते. त्यामुळे बऱ्याच वेळा मुली फेशिअल, ब्लिच, क्लीनअप असे नानाविध प्रकार करतात. पण लग्नाच्या ४-५ दिवसआधी ब्यूटी ट्रीटमेंट करणं नुकसानदायक ठरत. कारण काही मुलींची स्कीन सेन्सिटीव्ह असते, काहींची ड्राय तर काहींची ऑइली असते. त्यामुळे अशा त्वचेसाठी वेगवेगळ्या ब्युटी ट्रीटमेंट असतात. मात्र काही वेळा योग्य प्रोडक्ट किंवा क्रीम न वापरल्यामुळे त्याचा परिणाम चेहऱ्यावर होऊ शकतो. चेहऱ्यावर लाल पूरळ किंवा पुटकुळ्या येऊ शकतात.

**अतिरिक्त व्यायाम :** लग्नात बारीक दिसावं याकडे मुलींचा जास्त कल असतो. त्यामुळे मुली बऱ्याचदा लग्नापूर्वी डाएट, व्यायाम करतात. तसंच लग्नाच्या १०-१२ दिवस आधी हार्ड वर्कआऊट करतात. परंतु यामुळे त्या थकतात आणि सोबतच चेहरा ही अगदी फिका पडतो.

**फास्ट फूड खाणे :** लग्नात मेकअपमुळे तर आपलं सौंदर्य वाढतंच मात्र त्याचप्रमाणे चेहऱ्यावर तजेला असणंही गरजेचं आहे. तजेला असेल तरच सौंदर्यात भर पडते. नितळ आणी सतेज चेहरा हवा असेल तर आपल्या आहाराकडे विशेष लक्ष देणं गरजेचं आहे. या काळात फास्ट फूड खाणं कमी करावं आणि पौष्टीक पदार्थ खाण्यावर भर द्यावा. फास्ट फूड खाल्यामुळे बऱ्याचदा चेहऱ्यावर पिंपल्स येण्याची शक्यता असते. त्यामुळे शक्यतो फास्ट फूड टाळावे.

# घसादुखीवर 'हे' झटपट घरगुती उपाय नक्की येतील कामी

**ऋतू** बदलले की शरीराच्या अनेक समस्या उद्‌भवतात. तसेच थंडीत अंगदुखी, पाठदुखीसोबत घसा खवखवणे, घसा दुखणे असे आजार देखील उद्भवतात. अशा वेळी आपल्याला कधी कधी गिळताना, बोलताना घशाला त्रास होतो. यालाच Throat inffection असेही म्हणतात. साधारणतः सर्दी, खोकला याप्रमाणे हा घशाला होणारा त्रास हे देखील व्हायरल इन्फेक्शन आहे. हे इन्फेक्शन काही दिवसांत आपोआप कमी होते. यामुळे याच्यावर काही इलाज करु नये असेही नाही. त्या समस्येकडे लक्ष न दिल्यास घशाला सूज येणे, टॉन्सिल्स लाल होणे, त्यावर पांढरे चट्टे येणे यांसारखे गंभीर आजार होऊ शकतात. अशा वेळी मग यावर त्वरित काय उपाय करता येईल अशा प्रश्न अनेकदा पडतो. म्हणूनच यावर झटपट घरगुती उपाय कोणते करता येईल ते पाहूया..



१. घशाला सूज उतरवण्यासाठी गरम पाणी पिण्याचे व हळद मिठाच्या पाण्याच्या गुळण्या करता येतील.

२. घसा दुखत असल्यास तोंडात आल्याचा तुकडा ठेवल्यास थोडा आराम मिळतो.

३. आलं, टोमॅटो आणि मधाचा रस एकत्र करून घेतल्याने घसादुखीपासून आराम मिळतो.

४. मध आणि कांदा टाकून उकळलेलं पाणी गाळून ते थोड्या-थोड्या वेळाने प्यावे.

५. पाण्यात बडीशेप टाकून ते पाणी उकळून घ्यावं आणि त्यानंतर त्यात मध टाकून हे पाणी थोड्या थोड्या वेळाने प्यावे. याने घशाला आराम मिळेल.

याप्रमाणेच लिंबाचा रस आणि मध टाकलेले गरम पाणी प्यायल्यानेही घशाला आराम मिळतो. लवंग चघळल्यानेही घसादुखी कमी होते. थंडीत तुम्हाला जर तुम्हाला घसादुखीचा त्रास उद्‌भवत असेल तर हे उपाय नक्कीच मदत करतील.

# जेवण केल्यानंतर लगेच झोपण्याचे दुष्परिणाम

अवेळी, तसेच लगेच झोपे येणे धोकायदायक आहे, अशी झोप टाळली पाहिजे, कारण दुपारी जेवल्यानंतर एक छोटी डुलकी घ्यायची सवय काहींना असते. जेवल्यावर लगेच झोपणे धोकादायक ठरू शकतं. कारण जेवल्यानंतर, नाष्टा केल्यानंतर किंवा काहीही खाल्ल्यानंतर झोपणं हे शरीराच्या आरोग्यासाठी हानीकारक मानलं जातं.



**चयापचय म्हणजे पचनास अडथळा :** जेवल्यावर तातडीने झोपल्यास पोटात गेलेल्या अन्नाचं योग्य पद्धतीने पचन होत नाही. यामुळे शरीरात एक विशिष्ट प्रकारचं आम्ल तयार होतं आणि ते छातीत जातं. यामुळे अनेक वेळा आंबट ढेकरही येतात. शिवाय अन्नाचं योग्य पद्धतीने पचन न झाल्यास अनेक आजार जडू शकतात.

**वजन वाढण्याचे दुष्परिणाम :** जर तुम्ही जेवल्यानंतर लगेच झोपलात तर, कॅलरीज योग्य पद्धतीने बर्न होत नाहीत. त्यामुळे वजन वाढण्यास मदत होते. आपणं जेवढं खातो त्यापेक्षा जास्त शरीरातील कॅलरीज बर्न करणं गरजेचं असतं. यामुळे शरीराचं कार्य उत्तम राहण्यास मदत होतं.

**ॲसिडीटीचा त्रास वाढतो :** ॲसिडीटीमुळे शरीराला फार त्रास होतो, शिवाय झोपही लागत नाही. तातडीने झोपल्याने पोटात आम्ल तयार होतं. यामुळे ॲसिडीटी होण्याची दाट शक्यता असते.

**हृदयासंबंधीचे आजार बळावतात :** जेवल्या जेवल्या झोपल्याने पचनक्रिया बिघडते. याचा परिणाम रक्तदाब आणि रक्तातील साखरेचं प्रमाण वाढतं. यामुळे हृदयावर परिणाम होऊन त्यासंबंधीचे आजार बळावू शकतात. त्यामुळे जेवल्यावर तातडीने झोप घेणे धोकेदायक आहे.

# चमकदार दातांसाठी झोपण्याच्या वेळेस करा ही कामे

**आजच्या जाहिरातीच्या युगात सारेच टुथपेस्ट ब्रॅण्ड चमकदार दातांचा दावा करतात. डेण्टिस्टकडे चमकदार दातांसाठी अनेक ट्रीटमेंट उपलब्ध असतात. पण अनेक घरगुती उपायांनीही तुम्ही तुमचे दात चमकदार बनवू शकता.**

नारळाचे तेल ऑरगॅनिक आणि नॅच्युरल टीथ व्हाईटनर आहे. नारळाच्या तेलाने तुम्ही तुमचे दात चमकवू शकता. यासाठी थोडेसे नारळाचे तेल घेऊन १५ मिनिटे तोंडात ठेवा. त्यानंतर साध्या पाण्याने चूळ भरा. यामुळे फायदा होईल. दात चमकवण्यासाठी सोपा उपाय म्हणजे स्ट्रॉबेरीज. स्ट्रॉबेरीच्या गरात चिमूटभर बेकिंग सोडा मिसळा. हे मिश्रण ब्रशवर घेऊन दात घासा. यामुळे दातांवरील पिवळेपणा दूर होईल. ॲपल सिडार व्हिनेगरही दात चमकावण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. याचे काही थेंब दातांवर चोळा. अधिक फायद्यासाठी सकाळी ब्रश करण्याआधी या व्हिनेगरने दात चोळा.



# नाश्त्यामध्ये ब्रेड, कॉर्नफ्लेक्स खाणे शरीरासाठी हानीकारक

**सकाळच्या** नाश्त्यामध्ये अधिक जणांना ब्रेड, कॉर्नफ्लेक्स आणि अनेक तळलेले पदार्थ खाण्याची सवय असते. मात्र हे पदार्थ फुफ्फुसाच्या कॅन्सरला कारणीभूत ठरत असल्याचे नव्या संशोधनात समोर आलेय. व्हाईट ब्रेड, कॉर्नफ्लेक्स असे ग्लायसेमिक इंडेक्सयुक्त पदार्थ खाल्ल्याने फुफ्फुसाचा कॅन्सर वाढण्याची शक्यता असते. संशोधनादरम्यान ज्यांना हा आजार झाला होता अशा एक हजार ९०५ जणांना समाविष्ट केले होते. त्याचबरोबर दोन हजार ४१३ स्वस्थ व्यक्तींचेही निरीक्षण करण्यात आले. यादरम्यान त्यांच्या आहाराच्या सवयी जाणून घेतल्या. शोधकर्त्यांचे म्हणणे आहे की तंबाखू तसेच धूम्रपान न करणाऱ्या लोकांमध्येही फुफ्फुसाच्या कॅन्सरची लक्षणे आढळली. ज्यावरून त्यांच्या आहाराच्या सवयी या कॅन्सरसाठी कारणीभूत असल्याची शक्यता आहे.



# शरीरात युरिक ॲसिडचे प्रमाण वाढले असेल तर या नॅचरल ड्रिंक्सने बॉडीला करा डिटॉक्स

योग्य खानपान आणि औषधांमुळे तुम्ही शरीरात तयार होणाऱ्या युरिक ॲसिडच्या स्तराला नियंत्रित करू शकता. युरिक ॲसिडची अधिकता शरीराला बऱ्याच प्रकारे नुकसान पोहोचवते. आम्ही तुम्हाला अशा काही नॅचरल ड्रिंक्सबद्दल सांगत आहोत ज्याचे सेवन केल्याने शरीरातील युरिक ॲसिडचे स्तर कमी होतील आणि तुम्हाला त्याचा योग्य फायदा देखील मिळेल.



**नारळपाणी**

युरिक ॲसिडच्या स्तराला नियंत्रित करण्याचा सर्वात उत्तम उपाय पाणी आहे. पाण्याशिवाय नारळपाणी देखील युरिक ॲसिडला नियंत्रित करतो. हे युरिक ॲसिडला पातळ करून किडनीला उत्तेजित करतात ज्यामुळे शरीरातून युरिक ॲसिड मूत्राच्या माध्यमाने बाहेर निघून जाते.

**मोसंबी आणि पुदिना**

या ड्रिंकमध्ये पर्याप्त मात्रेत व्हिटॅमिन असतात, जे युरिक ॲसिडच्या स्तराला कमी करण्यास मदत करतात. याचे सेवन करण्यासाठी मोसंबीचे साल काढून त्याच्या बारीक बारीक फोडी करून त्यात लिंबाचा रस आणि पुदिन्याचे पान घालावे व या मिश्रणाला मिक्सरमधून फिरवून त्याचा ज्यूस काढावा व त्याचे सेवन करावे.

**ब्लॅक चेरी आणि चेरी**

ब्लॅक चेरी आणि चेरीचा ज्यूस युरिक ॲसिडमुळे होणारे संधिवात किंवा किडनी स्टोनच्या समस्येसाठी योग्य आहे. ब्लॅक चेरी युरिक ॲसिडच्या सीरम स्तराला कमी करून संधिवात आणि किडनीहून क्रिस्टल दूर करण्यास मदत करते. यात अँटीऑक्सिडेंट आणि अँटी इंफ्लेमेंटरी गुणदेखील असतात, जे युरिक ॲसिडला कमी करण्यास मदत करतात.

**खिऱ्याचे सूप**

खिऱ्याचे सूप शरीराला हायड्रेड ठेवण्यासोबत युरिक ॲसिडच्या स्तराला कमी करतो. याचे सेवन करण्यासाठी एका भांड्यात खिऱ्याचा ज्यूस, पाव कप योगर्ट, पुदिन्याचे पान आणि लिंबाचा रस घालून मिक्सरमधून फिरवून घ्या आणि थोड्या वेळाने गार झाल्यावर त्याचे सेवन करा.

**सेबचा सिरका**

सेबचा सिरका शरीरातून युरिक ॲसिडला दूर करण्यास मदत करतो. अँटीऑक्सिडेंट आणि एंटीइंफ्लेमेंटरी गुणांमुळे हे शरीरात क्षारीय ॲसिड संतुलन बनवून ठेवतो. हा सिरका रक्ताच्या पीएच वॉल्यूमला वाढवून युरिक ॲसिडला कमी करण्यास मदत करतो.

**अननसाचा ज्यूस**

या ज्यूसमध्ये व्हिटॅमिन सी सोबत इतर अँटीऑक्सिडेंट असतात जे युरिक ॲसिडच्या स्तराला कमी करून शरीरातून बाहेर काढण्यात मदत करतात. याचे सेवन केल्याने शरीराला दुसरे इतर फायदेदेखील मिळतात.

# जैन मंदिराबाबत हायकोर्टाच्या निकालानंतर बीएमसी इंजिनिअर्स आक्रमक



**■मुंबई** : विलेपार्ले येथील पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिरावर मुंबई महापालिकेने केलेली तोडक कारवाई योग्य असल्याचा निवाळा मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे. त्यामुळे आक्रमक झालेल्या म्युनिसिपल इंजिनिअर असोसिएशनने मंत्री मंगलप्रभात लोढा यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करून त्यांची आमदारकी रद्द करण्याची मागणी इंजिनिअर्स असोसिएशनने केली आहे.

पालिकेच्या के पूर्व विभागाने जैन मंदिरावर हातोडा चालवल्यानंतर तोडक कारवाईविरोधात समाजाला भडकावण्याचे काम केले असल्याचा आरोप इंजिनिअर्स असोसिएशनने केला आहे. समाजाचा मोर्चा काढून पालिका अधिका[]यांवर कारवाई करण्याची मागणी केली होती. त्यांच्या या मागणीनंतर पालिका प्रशासनाने सहाय्यक आयुक्त नवनाथ घाडगे यांची तडफडकी बदली झाली होती, असे असोसिएशनतर्फे सांगण्यात आले. हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयापर्यंत जाऊन आले आहे. ते मंदिर नसून पत्रा शेड होते. तोडक कारवाईदरम्यान कोणी पुढे आले नाही. उच्च न्यायालयाने स्थगिती दिल्यानंतर हे सगळे समोर आले होते. सहआयुक्त नवनाथ घाडगेंचे पुनर्स्थापन सन्मानाने करायला पाहिजे. गोपनीयतेची शपथ घेतलेले मंत्री कसे काय एका समाजाला भडकावतात? मोचार्चे नेतृत्व कसे करू शकतात? असे सवाल इंजिनिअर्स असोसिएशनच्या वतीने करण्यात आले.

**ह्यत्या अनधिकृत बांधकामावर कारवाई करावीह्व**

मुंबई महानगरपालिकेने धर्मांध झुंडशाहीच्या समोर गुडघे न टेकता अनधिकृत बांधकामावर तोडक कारवाई करावी, अशी मागणी शिवसेना शिंदे गटाचे विभागप्रमुख दिलीप नाईक यांनी पालिका आयुक्तांकडे एका पत्राद्वारे केली आहे. विलेपार्ले येथील जैन मंदिराचे बेकायदेशीर बांधकामावर महापालिका प्रशासनाने सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून तोडक कारवाई सुरू केली. या मंदिराबाबत केलेल्या कारवाईने संतप्त होऊन मोठ्या प्रमाणावर जैन समाज रस्त्यावर उतरला, असे नाईक म्हणाले.

## महिलांच्या मदतीसाठी लॉटरी पद्धत बंद करावी

**■कल्याण** : कन्यादान योजना व विधवा पत्नी अनुदान योजना लॉटरी पद्धतीने न काढता सर्व विधवा महिलांना सरसकट मदत करावी अशी मागणी स्फूर्ती फाउंडेशनने कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या महिला आणि बालकल्याण विभागाकडे केली आहे. कल्याण डोंबिवली महानगरपालिका कन्यादान योजना आणि विधवा पत्नी अनुदान योजनेत दरवर्षी मदत महिला आणि बालकल्याण विभागाच्या माध्यमातून देण्यात येते. यामध्ये मागील १ आणि २ वर्षांमध्ये मृत्यू झालेल्या पुरूषांच्या पत्नीला ही मदत देण्यात येते. तसेच अशी मदत संबंधित कालावधीत येत असलेल्या सर्व महिलांना देण्यात येत होती. नुकतीच महिला बालविकास विभागामार्फत काढण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये दोन्ही योजनांमध्ये लॉटरी पद्धतीने मदत करण्यात येणार असून ज्या महिलांचे नाव लॉटरीमध्ये येणार नाही, त्यांच्या मदतीचे काय? असा सवाल स्फूर्ती फाउंडेशन ने केला आहे.

मदत असेल तर ती गरजू महिलांना नियमानुसार सर्वांना मिळाली पाहिजे असे लॉटरी पद्धतीने मदत करणे म्हणजे महिलांच्या दुःखावर मिठ चोळण्यासारखे असून ज्याचा घराचा आधार गेला अशा महिलांचा अपमान असून लॉटरी पद्धत बंद करून सरसकट मदत करावी. तसेच यापूर्वी ५ वर्षात ज्या महिलांनी लाभ घेतला नाही अशा सर्व महिलांना मदत मिळावी अशी मागणी स्फूर्ती फाउंडेशन अध्यक्ष बजरंग तांगडकर, महिला प्रमुख शिल्पा तांगडकर, जेष्ठ पत्रकार शांताराम तांगडकर यांच्या वतीने करण्यात आली आहे.

## भिवंडीतील अंजुरफाटा-चिंचोटी रस्त्याची दुर्दशा



**■भिवंडी** : मानकोली अंजुर फाटा ते चिंचोटी रस्त्याची प्रचंड दुरावस्था झाली आहे. या रस्त्यावर प्रचंड खड्डे पडल्याने नागरिकांना आपला जीव मुठीत धरून या महामार्गावरून प्रवास करावा लागत आहे. मात्र रस्त्याच्या या दुरावस्थेकडे सरकारी यंत्रणा, सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष झाले आहे. या रस्त्यावर कालवार गावाजवळ भला मोठा खड्डा पडल्याने रस्त्याला तळ्याचे स्वरूप आले आहे. या खड्ड्यात मोठा टेम्पो अदळल्याने टेम्पो नादुरुस्त होऊन बंद पडला.

हा खड्डा इतका मोठा होता की टेम्पोचे पुढचे चाक खड्ड्यात तर मागचे चाक वर उचलले गेले. या मार्गावर टोल वसुली करणाऱया सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीकडून हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाने ताब्यात घेत येथील टोल वसुली बंद करण्याचे आदेश दिले आहेत.त्यामुळे या रस्त्याच्या दुरावस्थेकडे बांधकाम विभागासह कोणत्याही यंत्रणेचे लक्ष नाही. सध्या या रस्त्यावर प्रचंड खड्डे पडले असून पावसाळ्यात या रस्त्यावरील खड्डे भरणार कोण? असा प्रश्न आता उपस्थित होत असल्याने या पावसाळ्यात येथील ग्रामस्थांसह वाहन चालकांना खड्ड्यातूनच प्रवास करावा लागणार अशी परिस्थिती आहे.

## जव्हार तालुक्यात पर्यटन बहरले




**■जव्हार** : थंड हवेचे ठिकाण, धाकटी जेजुरी आणि आदिवासी राजवट लाभलेल्या जव्हारचे सौंदर्य पावसाळ्यात अतिशय मनमोहक असते. सोसाट्याचा वारा, दाट धुके पडत गेल्या काही दिवसांपासून पावसाला चांगली सुरुवात झाल्याने येथील वातावरणात प्रचंड गारवा जाणवू लागला आहे. त्यामुळे पावसाळी सहलीचे बेत होऊन जव्हारला प्रथम पसंती मिळत असल्याने येथील पर्यटन बहरले आहे. येथील वातावरणाचे वैशिष्ट्य म्हणजे भन्नाट रानवारा, निसर्गानं हिरवा शालू पांघरलेला सुंदर नजराणा, खळाळणारे झरे, पाऊस आल्यानंतर धो-धो वाहणारे धबधब... अन् बरंच काही... निसर्गाचं वरदान लाभलेली भूमी म्हणजे जव्हार होय. या तालुक्यात अनेक पर्यटनस्थळे आहेत या सृष्टीच्या अकल्पित आनंदाचा मोह आवरता न आल्याने येथे पर्यटकांची आता गर्दी होईल, तथापि, सुरक्षेच्या दृष्टीने प्रशासनाने तातडीने उपाययोजना करण्याची गरज आहे. या करीता स्थानिक प्रशासनाने धबधब्यांच्या ठिकाणी काही अटी शर्ती घालत ३० सप्टेंबरपर्यंत मनाई आदेश जारी केला आहे. तालुक्यात धबधब्यांवर जाण्यासाठी पर्यटकांची विशेष ओढ असते. पावसात भिजल्यानंतर गरम गरम जेवण मिळण्याची व्यवस्था आता धबधब्यापासून काही अंतरावर झाली असल्याने, पर्यटकांना आपला आनंद लुटण्यासाठी एक वेगळा वाव या तालुक्यात तयार होऊ लागला आहे. शिवाय जव्हार शहरात निरनिराळ्या प्रकारचे हॉटेल्स, कुटीर आणि वर्षा सहलीचे नियोजन होऊ लागल्याने पर्यटकांना ही एक पर्यटन पर्वणी असून ही मौज मजा काही औरच असते.

### जव्हार पर्यटनात काय पहाल?

- **हिरडपाडा धबधबा** : जव्हार शहरापासून सुमारे १३ कि.मी. अंतरावर असणाऱया हिरडपाडा गावात असणारा धबधबा खूप मोठा व उंचीवरून कोसळणारा धबधबा आहे. हा धबधबा जास्त प्रचलित नव्हता मात्र , आता समाज माध्यमांच्या वापराने हे पर्यटन स्थळ निदर्शनास येत आहे. पूर्वी, धबधब्यापर्यंत जायला पुरेशी चांगली अशी व्यवस्था नव्हती. मात्र , यंदा थोडी पायपीट केली तर नयनरम्य असा हिरडपाडा धबधबा आपणाला पाहायला मिळतो ,हा धबधबा लेंडी नदी वरून पडतो, वर्षा सहली करिता हे एक उत्तम ठिकाण आहे.
- **काळमांडवी धबधबा** : जव्हार शहरापासून ५ किमी अंतरावर असणाऱया केळीचा पाडा या गावातून ३ किमी अंतरावर आत गेल्यावर आपणाला ह्व काळमांडवी धबधब्याचे दर्शन होते, काळशेती नदीवरून धबधबा पडत असल्याने या धबधब्याचे नाव ह्वकाळमांडवीह्व असे पडले आहे. अतिशय सुंदर अशी निसगार्ची कलाकृती बघायला पर्यटक मोठ्या प्रमाणात गर्दी करतांना दिसतात , पर्यटक पाण्यात उतरून एन्जॉय करतात , पाऊसळ्यात मातीचा रस्ता असल्याने सरकता होतो. व गावातच वाहने पार्क करून त्या पर्यटन ठिकाणी पोहचावे लागत आहे.
- **दाभोसा धबधबा** : जव्हार शहरापासून १७ कि.मी. अंतरावर असलेले नैसर्गिक पर्यटनस्थळ म्हणजे दाभोसा धबधबा. या धबधब्यावर पर्यटकांची झुंबड उडाली असून अनेक पर्यटक नैसर्गिक धबधब्यावर ठाणे, गुजरात, नाशिक, सेलवास, वाडा, विक्रमगड, या ठिकाणाहून डोंगरदरीतील नैसर्गिक धबधबा पाहायला मिळत आहे. त्याचा आनंद घेतांना सुट्टीच्या दिवशी शनिवार, रविवार मोठी गर्दी होतांना दिसत आहे.
- **खडखड धरण** : जव्हार शहरापासून साधारण सहा किलोमीटर अंतरावर खडखड धरण आहे. मुसळधार पावसामुळे हे धरण दुथडी भरून वाहत असल्याने पर्यटकांचा ओघ मोठ्या प्रमाणात या ठिकाणी पाहायला मिळतो. सांडग्यावरून कोसळणाऱया पांढराशुभ्र पाण्याने ओलचिंब भिजत पावसाचा मनमुराद आनंद घेताना पर्यटक हा स्वतःच्या दुनियेत रममाण होतो.
- **जयसागर जलाशय** : साधारण गेल्या साठ वर्षापूर्वी जव्हार शहरातील नागरिकांना पाणीपुरवठा व्हावा, याकरिता जव्हार संस्थानातील नरेश यशवंतराव मुकणे महाराज यांनी जय सागर जलाशयाची निर्मिती केली. पावसाळ्यात हा परिसर अतिशय नयनरम्य असून या ठिकाणी येऊन फोटोग्राफी करण्याकरिता पर्यटक प्रथम पसंती देत आहेत.

## पलावा उड्डाणपुलावरून आरोप-प्रत्यारोप
## कामाच्या गुणवत्तेवरून राजकीय संघर्ष




**■डोंबिवली** : पलावा उड्डाणपुलाच्या उद्घाटनानंतर अवघ्या काही तासांत तो बंद करण्यात आल्याने राजकीय वातावरण चांगलेच तापल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. पुलाचे काम निकृष्ट दजार्चे असल्याचा आरोप करत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) आणि मनसेने टीकेची झोड उठवली आहे, तर सत्ताधारी शिवसेना (शिंदे गट) आणि आमदार राजेश मोरे यांनी हे सर्व आरोप फेटाळून लावत पूल दजेर्दार असून या पुलामुळे लोकांना दिलासा मिळत असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे म्हणाले की, ४ जुलै रोजी शिवसेनेच्या जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे यांच्या हस्ते पुलाचे उद्घाटन करण्यात आले. मात्र उद्घाटनानंतर वाहतुकीदरम्यान एका दुचाकीस्वाराचा अपघात झाला. त्यामुळे काळजीच्या दृष्टिकोनातून आम्ही तात्पुरता पूल बंद करण्यात आला होता. डांबरीकरणावर ऑइल साचल्याने वाहने घसरत होती, म्हणून आम्ही तातडीने स्टोनक्रशर टाकून उपाययोजना केली. त्यानंतर सायंकाळी पुन्हा पूल वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. याप्रसंगी शिवसेना उपजिल्हाप्रमुख राजेश कदम यांनी विरोधकांकडे आता काम उरलेले नाही, म्हणून ते उगाच विरोध करत आहेत. पूल चांगला झाला असून नागरिक समाधानी आहेत. आता वाहतूककोंडीही होत नसल्याचे म्हटले आहे.

> "स्टोनक्रशरमुळे काही ठिकाणी खड्ड्यासारखे वाटले तरी प्रत्यक्षात ते खड्डे नव्हते. विरोधकांनी त्याचे फोटो घेतले आणि सोशल मीडियावर प्रसारित करून दिशाभूल केली. पुलाचे काम चांगल्या प्रकारे झाले आहे. वाहतूक सुरळीतपणे सुरू आहे. काळजीच्या दृष्टिकोनातून आम्ही तात्पुरता पूल बंद करण्यात आला होता."
>
> **-राजेश मोरे, आमदार कल्याण ग्रामीण**

## वरसावे ते काजूपाडा रस्त्यावरील खड्डे बुजवण्यास पालिकेकडून सुरूवात




**■भाईंदर** : ठाणे-घोडबंदर रस्त्यावरील वरसावे ते काजूपाडा या ठिकाणी मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्यामुळे वाहनचालकांना त्रास सहन करावा लागत होता. या खड्ड्यांमुळे वाहतूक कोंडी देखील होत होती. वरसावे ते काजूपाडा, गायमुख पर्यंत हा रस्ता राज्य शासनाकडे होता. आता हा रस्ता मिरा- भाईंदर महापालिकेकडे हस्तांतरित करण्यात आला आहे. त्यामुळे या रस्त्याची देखभाल दुरुस्ती महापालिकेकडून करण्यात येणार आहे. सध्या या कामासाठी महापालिका खर्च करणार आहे. त्यानंतर हा खर्च एमएमआरडीएकडून घेतला जाणार असल्याचे सांगितले जात आहे. मिरा- भाईंदर महापालिकेने या रस्त्यावर पडलेले खड्डे बुजवण्यास सुरूवात केली आहे. यामुळे वाहन चालकांना दिलासा मिळणार आहे. तर सदरील रस्त्याचे काम हे गेल्या वर्षी काही दिवस बंद ठेवून सार्वजनिक बांधकाम विभागाने केले होते, त्यात भ्रष्टाचार झाल्याने सदरील रस्ता एका महिन्याच्या आताच पुन्हा उकळला गेला होता. त्यामुळे वाहन चालकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत होता.

मिरा-भाईंदर आणि ठाणे या दोन प्रमुख शहरांना जोडणारा तसेच या मार्गावरून पश्चिम उपनगरातील प्रवाशांना नाशिक व पुणे येथे जाण्यासाठी महत्वाच्या असलेल्या घोडबंदर या राज्य महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम नियोजित आहे. त्या कामासाठी एमएमआरडीए खर्च करणार आहे. तत्पूर्वी तत्कालीन मुख्यमंत्री तथा विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानुसार राज्य शासनाने हा रस्ता दोन्ही महापालिकांकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे. गेल्या वर्षी या रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांची दुरुस्ती नव्हे तर या महामार्गावरील चेना ते काजूपाडा दरम्यानच्या संपूर्ण रस्त्याचेच नवीन बांधकाम राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करोडो रुपये खर्च करून करण्यात आले होते. मात्र, हे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याने अवघ्या महिनाभरात त्या रस्त्यावर पुन्हा खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले. यानंतर हा रस्ता दोन्ही महापालिकांकडे हस्तांतरित करण्यात आल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाला चांगलेच झाले आहे. यावर्षी या रस्त्यांवरील खड्डे बुजवण्यासाठी संबंधित महापालिकांना त्यांच्या तिजोरीतून निधी खर्च करावा लागणार असल्याचे सांगितले जात आहे. मिरा-भाईंदर महापालिका हद्दीतील या महामार्गावरील वरसावे ते काजूपाडा या रस्त्यावर पडलेले खड्डे बुजवण्याचे काम महापालिकेने सुरू केले आहे.

या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी जवळपास २ कोटींचा खर्च अंदाजित करण्यात आला आहे. स्थानिक वाहतूक शाखेने या कामासाठी परवानगी दिली आहे. या रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामाला सुरुवात केल्यामुळे या मार्गावर गतवर्षी प्रमाणेच प्रचंड वाहतूक कोंडी होत असल्याचे दिसून येत आहे. सध्या पाऊस असल्यामुळे खड्डे बुजवले जात आहेत. या महामार्गावरील खड्ड्याची दुरुस्ती मास्टिक तंत्रज्ञानाने करण्यात येणार आहे. त्यातही पावसाचा व्यत्यय आल्यास दुरुस्ती मोहीम आणखी लांबणार आहे. मात्र पावसाने उघडीप घेताच या रस्त्याची दुरुस्ती लवकरात लवकर करण्यात येणार असल्याचे महापालिका सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सांगण्यात आले आहे

> "घोडबंदर रस्त्यावरील वरसावे ते काजूपाडा येथील खड्डे दुरुस्तीसाठी ठेकेदाराची नियुक्ती करण्यात आली आहे. खड्डे दुरुस्तीवेळी या मार्गावर वाहतूककोंडीची समस्या मोठ्याप्रमाणात उद्भवणार असल्याने स्थानिक वाहतूक शाखेच्या सहकार्याने येथील वाहतुकीचे नियोजन केले जाणार आहे. या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी लागणारा खर्च तूर्तास पालिकेच्या तिजोरीतून करण्यात येणार आहे. या रस्त्याचा खर्च एमएमआरडीएकडून उपलब्ध करून द्यावा यासाठी शासनासह एमएमआरडीएकडे पत्रव्यवहार करण्यात येणार आहे."
>
> **-राधाबिनोद शर्मा, आयुक्त झ्र मिरा-भाईंदर महापालिका**

## जाहिरात फलक दिसण्यासाठी झाडाला विष दिल्याची तक्रार, गुन्हा दाखल



**■भाईंदर** : काशिमिरा पोलीस ठाणे हद्दीतील मिरा- महाजनवाडी येथे ठेकेदाराने जाहिरात फलक दिसण्यासाठी झाडावर विषारी रसायन टाकून त्याची हत्या केल्याची तक्रार करण्यात आली होती. पर्यावरणप्रेमींच्या तक्रारीनंतर महापालिकेने केलेल्या पाहणीत हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी एका जाहिरात कंपनी विरोधात काशिमिरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिरा- भाईंदर महापालिकेत मुख्य माळी म्हणून कार्यरत असलेले दत्तात्रय गभाले यांनी दिलेल्या तक्रारी नुसार महाजनवाडी, लता मंगेशकर नाट्यगृहाला लागून असलेल्या स्टार गेस्ट हाऊससमोर आणि राष्ट्रीय महामार्गाच्या बाजूला असलेल्या मे. एंगेज आउटडोर मिडिया यांच्या जाहिरात फलकासमोरचे एक 'पेल्टोफोरम' प्रजातीचे झाड मशीन किंवा इतर हत्याराने होल करून, त्यात केमिकल टाकून सुकवल्याचे आढळून आले होते. या घटनेची तक्रार पर्यावरणप्रेमींनी महापालिकेकडे केली होती. या तक्रारींच्या आधारे, महापालिकेच्या वन विभागाने प्रत्यक्ष पाहणी केली असता, झाडाला होल करून त्यात रसायन टाकल्याचे दिसून आले. या घटनेचा पंचनामा करून २९ मे २०२५ रोजी मे. एंगेज आउटडोर मिडिया यांना नोटीस बजावण्यात आली होती. कंपनीने या नोटीसला लेखी खुलासा सादर केला. मात्र, त्यांनी ह्लकेमिकल टाकून झाड सुकविले नाही असे म्हटले होते. असे असले तरी, हे झाड त्यांच्या होल्डिंगजवळच असल्याने, हे कृत्य त्यांनीच केले असल्याचे स्पष्ट होत आहे, असे सांगत या खुलाशास अमान्य करत, मे. एंगेज आउटडोर मिडिया यांच्याविरुद्ध महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ च्या कलम २१(१) अंतर्गत तसेच वृक्ष संरक्षण आणि संवर्धन नियम, २००९ सह शासन आदेश, अधिसूचना प्रकरण ५ कलम ८ (३) (क) आणि प्रकरण ८ कलम २१(१) च्या नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल काशिमिरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मुलीच्या नावाने ॲपवर अकाऊंट काढून फसवणूक



**■भाईंदर** : जसं जसे जग इंटरनेटच्या मदतीने जवळ येते आहे,तस तसे फसवूक होऊन लुबाडले जाण्याचे प्रकारले वाढले आहे.इंटरनेटचा वापर करून काही जण विधायक कामं करतात, तर काहीजण असे देखील आहेत,जे याचा वापर करून फसवणूक पण करत आहेत.असाच प्रकार मिरारोडच्या काशीगाव पोलीस ठाणे हद्दीत घडला आहे. एका डेटिंग ॲपद्वारे नागरिकांना जाळ्यात ओढून त्यांचे फोटो काढून ब्लॅकमेल करत खंडणी उकळणाऱ्या आरोपीला खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखेने अटक केली आहे. या फसवणुकीच्या गुन्ह्यात आरोपी सागर रावल याने महिलेच्या नावाने अकाऊन्ट काढून ॲपद्वारे फिर्यादीशी ओळख केली. फिर्यादीस चॅटींगद्वारे काफी पिण्याच्या बहाण्याने बरिस्ता कॉपी सेंटर जेपी नॉर्थ, काशीगाव येथे बोलवले.

त्या ठिकाणी आरोपीची महिला साथीदार हिने फिर्यादीस भेटून घरी कोणी नाही. ती चांगला मसाज करते असे सांगून मालिश करण्याच्या बहाण्याने फिर्यादीस अपना घर फेज-२ हाटकेश येथे नेले. त्या ठिकाणी फिर्यादीस मसाज करता कपडे काढण्यास सांगितले. या दरम्यान रुममध्ये महिला आरोपीचे आणखीन चार अनोळखी साथीदार त्या ठिकाणी आले. त्यांनी फिर्यादीला तुझी बदनामी करु, अशी भिती दाखवली. त्यानंतर फिर्यादीस तुला मुलीची सर्व जबाबदारी घेवून तिच्या लग्न खर्चासाठी १० लाख रुपये द्यावे लागतील असे सांगितले.

घरात डांबून ठेवून हाताने मारहाण करुन शिवीगाळी, दमदाटी केली. तसेच जबरदस्तीने फिर्यादीच्या गळ्यातील सोन्याची चैन घेवून ती फिर्यादीच्या ओळखीच्या सोनाराकडे देवून ३ लाख ४५ हजार रुपये काढून घेतले,असे तक्रारीत म्हटले आहे. त्याबाबत फियार्दी यांनी महिला आणि अनोळखी चार व्यक्तींविरोधात दिलेल्या तक्रारीवरून काशिगाव पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमा अंतर्गत ११ जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

या गुन्ह्याचा समांतर तपास खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा करत होते. फिर्यादीचे मोबाईलचे तांत्रिक विश्लेषण आणि बातमीदाराने दिलेल्या माहितीवरून आरोपीचा शोध घेतला. यावेळी आरोपी सागर रमेश रावल (२६ ) आणि रुषभ देवेंद्र शिंदे ( २५ ) हे मिळून आले. त्याच्याकडे केलेल्या प्राथमिक तपासात त्याचे सहकारी पाजी, सोनु शेख व महिला आरोपी यांच्या मदतीने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले आहे. ताब्यातील आरोपींच्या अंगझडतीत १ लाख ४८ हजार रुपये किमतीचे मोबाईल जप्त करण्यात आले आहेत. दोन्ही आरोपींना पुढील तपास कामी काशिगाव पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

## तुमच्यावर मनी लाँडरींगचा गुन्हा दाखल
## २ कोटी द्या नाहीतर... ज्येष्ठाची सायबर फसवणूक




**मुदत ठेवी मोडल्या, सोन्यावर कर्ज घेतले**

या ज्येष्ठाने त्यांच्या बँकेतील ठेवी मोडल्या. म्युच्युअल फंडातील रक्कम, पोस्टात गुंतवलेले पैसे काढले. सोन्यावर कर्जही घेतले, घर सोसायटीकडे तारण ठेवत त्यावर काही लाखांचे कर्ज घेतले. उसने पैसे घेण्याची वेळ त्यांच्यावर आली.

**■ठाणे** : बँकखात्यात संशयित व्यवहार झाले आहेत, ' मनी लॉन्ड्रिंग ' मध्ये नाव आले आहे, त्यामुळे या केसमध्ये ताब्यात घेण्याची बतावणी करत दोषमुक्तीच्या नावाखाली सायबरचोरांच्या टोळीने एका व्यक्तीची दोन कोटींची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी बदलापूर पूर्व पोलिस ठाण्यात पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

एका खासगी कंपनीतून निवृत्त झालेली ही ६८ वर्षीय व्यक्ती बदलापूर पूर्व भागात राहते. त्यांना राजेश शर्मा याने फोन करून तुमच्या नावावर नोंदणी असलेल्या मोबाइल नंबरवर छळवणुकीच्या खूप तक्रारी आल्याचे सांगितले. ज्येष्ठाने हा नंबर माझा नसल्याचे सांगताच शर्मा याने नंबर तुमच्या नावावर घेण्यात आला आहे. तात्काळ मुंबईतील कुलाबा पोलिस ठाण्यात संपर्क करण्यास सांगितले. परंतु त्यावेळी ते बाहेर असल्याने त्यांना पोलिस ठाण्यात जाणे शक्य नव्हते.

नंतर शर्मा याने फोन मदत कक्षाला वळवला. समोरून बोलणाऱ्या व्यक्तीने पोलिस ठाण्यातील अधिकाऱ्यांशी फोन जोडून दिला. या अधिकाऱ्याने ज्येष्ठाला त्यांचे नाव मनी लॉन्ड्रिंग आणि काळ्या पैशाच्या व्यवहारात आले आहे. मुंबईतील एका बँकेच्या शाखेत असलेल्या बँक खात्यामध्ये संशयित व्यवहार चालू आहेत. राष्ट्रीय सुरक्षिततेच्या अंतर्गत ही केस असल्याचे भासवत आरोपींनी गुप्तता राखण्याचे निर्देश ज्येष्ठाला दिले आणि दुसऱ्या एका पोलिस अधिकाऱ्यांशी फोन जोडून दिला.

त्यानेही तुम्ही २४ तास निगराणीखाली असल्याचे सांगितले. त्यावेळी ज्येष्ठ नागरिक बाहेर होते. सीबीआयचे अधिकारी अशी बतावणी करणाऱ्या आरोपीकडून ज्येष्ठाने मुंबईला जाण्याची परवानगी घेतली आणि ते बदलापूर येथील घरी आले. आरोपींनी परत त्यांना फोन करून मनी लॉन्ड्रिंगच्या प्रकरणात कायद्यानुसार कारवाई केली जाईल. तुम्हाला ताब्यात न घेता ऑनलाइन प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल, असेही सांगितले. याविषयी कोणाला काही सांगितल्यास ताब्यात घेण्याची भीती दाखवली आणिज्येष्ठाकडून ऑनलाइनद्वारे पैसे उकळण्यास सुरुवात केली.

आरोपींनी त्यांच्याकडून दोन कोटी रुपये घेतल्यानंतर व्हिडीओ कॉलद्वारे त्यांना आणि त्यांच्या पत्नीला सर्व चौकशीतून दोषमुक्त केल्याचे सांगत पैसे ४८ तासांच्या आत खात्यावर येतील, असे सांगितले. मात्र ज्येष्ठाला पैसे मिळाले नाहीत. तसेच, आरोपींचे फोनही लागेनासे झाले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर ज्येष्ठाने पोलिसात तक्रार दिली.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com